महाराष्ट्र विधानपरिषद

दुसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०१५ / आषाढ २६, १९३७ (शके)

(१) शालेय शिक्षण, क्रिडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री
(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री
(३) पर्यावरण मंत्री
(४) पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ११८

राज्यातील थोर संत व समाजसेवकांचे साहित्य प्रकाशित करण्याबाबत

(१) * **८२६१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे व बिरसा मुंडा, संत रविदास, संत सुदर्शन, संत वाल्मिकी यांचे जीवन चरित्रावरील संपूर्ण साहित्य शासनाने प्रकाशित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील जनतेवर थोर संताच्या व समाजसेवकांच्या प्रतिमेचा व विचारांचा प्रभाव आहे त्यांच्या विचारांचे साहित्य सर्व समाजाच्या जनतेपर्यंत अभ्यासासाठी व माहितीसाठी प्रकाशित करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, थोर समाजसेवक व संताचे जीवनचरित्रावरील साहित्य तयार करण्यास शासन विशेष समिती गठीत करणार आहे काय,

(४) असल्यास, केव्हापर्यंत समिती गठीत करण्याचे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन चरित्रावरील निवडक साहित्य शासनाकडून प्रकाशित करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) थोर समाजसेवकांचे साहित्य प्रकाशित करण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून विशेष समित्या गठीत करण्यात आल्या असून, त्यानुषंगाने महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र प्रकाशित करण्यासाठी अनुक्रमे महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समिती, पुणे अशा ४ समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या व्यतिरिक्त अन्य थोर समाजसेवक व संतांचे जीवनचरित्रावरील साहित्य तयार करण्यासाठी अद्याप विशेष समिती गठीत करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश केंद्रीय पद्धतीने करण्याबाबत

(२) * ७२८९ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश केंद्रीय पद्धतीने करण्याबाबत नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनास पत्र पाठवून केंद्रीय पद्धतीने इयत्ता १ ली, ५ वी व ८ वी चे प्रवेश देण्यास विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१० पासून बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत असून अधिनियमातील तरतुदीनुसार सी.बी.एस.ई.अभ्यासक्रमाच्या शाळेत व इंग्रजी माध्यमाच्या प्राथिमक शाळेत २५ टक्के प्रवेश आर्थिकदृष्टया दुर्बल कुटुंबातील बालकांसाठी राखीव करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या तरतुदीनुसार १ कि.मी. व ३ कि.मी. अंतराच्या अटीवर तसेच १ लाख रु.वार्षिक उत्पन्न मर्यादेच्या अटीवर देण्याचे निर्देश शासनाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) परंतु यामुळे शाळांमध्ये स्पर्धा वाढून पालकांकडून वेगवेळी आमिष दाखवून ५ ते १० हजार रुपयांची मागणी करण्यात येत आहे शिक्षकांना दारोदार भटकावे लागत असल्याने त्यांची प्रतिमा मलीन होऊन त्यांचा सन्मान संपुष्टात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांना घटकात्मक अधिकार प्रदान करण्यासाठी व शिक्षकांचा सन्मान राखण्यासाठी इयत्ता १ ली, इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे केंद्रीय पद्धतीने प्रवेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत

(३) * ७५०६ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने सादर केलेल्या दिनांक १० एप्रिल, २०१५ च्या अहवालात माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वी व १० वी च्या प्रत्येक वर्गामध्ये ४० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल तर ती माध्यमिक शाळा बंद करण्यात येईल अशी शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४० पेक्षा कमी संख्या असलेल्या इयत्ता ९ वी व इयत्ता १० वीचे वर्ग असलेल्या शाळांची महसूल विभागनिहाय एकूण संख्या किती आहे,
(३) असल्यास, या अहवालासंदर्भात शिक्षक लोकप्रतिनिधीनी सादर केलेल्या दुरुस्ती संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.
(२) इयत्ता ९ वी, इ. १० वी चे वर्ग असलेल्या एकूण शाळा ६६ असून त्यांची महसूल विभागनिहाय संख्या पुढीलप्रमाणे :

कोकण	-	२०
नाशिक	-	६
पुणे	-	९
औरंगाबाद	-	१७
नागपूर	-	११
अमरावती	-	३

(३) प्रधान सचिव (शा.शि) यांच्या समितीने शासनास सादर केलेला अहवाल विभागाच्या संकेतस्थळावर जनतेच्या अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ प्रसारित करण्यात आला होता. त्यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यातील विविध संघटना, संस्था नागरिक, लोकप्रनिनिधी यांच्याकडून हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. बहुवर्ग बहुस्तर अध्यापन पध्दती, विद्यार्थ्यांचे समाजिकरण विद्यार्थ्यांचे समायोजन, अतिरिक्त शिक्षकांचे/ मुख्याध्यापकांचे पद निर्माण करणे, नवीन शाळा सुरु करणे आणि शाळांमध्ये संरचनात्मक बदलांबाबतचा प्रस्ताव मंत्री मंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे (पूर्व) येथील कोपरी भागातील अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या गोदामाची जागा नागरी सुविधासाठी देण्याचा घेतलेला निर्णय

(४) * ६७४२ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे (पूर्व) येथील कोपरी भागातील अन्न व नागरी पुरवठा विभागाची सुमारे ३ हजार चौरस मीटर गोदामाची जागा नागरी सुविधांसाठी देण्याच्या संदर्भात मा.ठाणे

पालकमंत्री व अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांची दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आणि या निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये कोणती उपाययोजना आखण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, दिनांक १२ मे, २०१५ रोजी मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली कोपरी (जि.ठाणे) येथील शासकीय गोदामाची जागा ठाणे महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्याबाबत मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालक मंत्री, ठाणे यांच्या उपस्थितीत बैठक झाली आहे.
(२) या संदर्भात या बैठकीमध्ये ठाणे महानगरपालिकेला विहित प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

मॅगी या खाद्यपदार्थाच्या तपासणीत कर्करोगाला कारणीभूत ठरणारा घटक गरजेपेक्षा जास्त प्रमाणात असल्याबाबत

(५) * ७०६० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मॅगी या खाद्यपदार्थाच्या तपासणीत मॅगीमध्ये मोनोसोडियम ग्लुटोमेट (अजिनोमोटो) हा कर्करोगाला कारणीभूत ठरणारा घटक गरजेपेक्षा जास्त प्रमाणात असल्याचे उघडकीस आलेले असून ही बाब राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्याही निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, सदर बाब गंभीर असून जनतेच्या आरोग्याशी संबंधित असल्यामुळे या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

मॅगी अन्न पदार्थाच्या लेबलवर No Added MSG असे लिहिलेले असून देखील मोनोसोडीयम ग्लुटामेट आढळून आले आहे. परंतु मोनोसोडीयम ग्लुटामेट कर्करोगास कारणीभूत असल्याबाबत कोणताही वैज्ञानिक पुरावा उपलब्ध नाही.

(२) देशभरात मॅगी नुडल्यची नमुन्यांमध्ये शिसाचे प्रमाण मर्यादेपेक्षा जास्त आढळले. या धर्तीवर महाराष्ट्रात प्रारंभी घेतलेल्या मॅगीच्या २० नमुन्यांच्या अहवालापैकी ०५ नमुन्यांमध्ये शिसाचे प्रमाण निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा जास्त आढळल्याने असुरक्षित घोषित करण्यात आले व सर्व नमुने MSG आढळून आल्याने मिथ्याछाप घोषित केले आहेत. सदर सर्व अहवाल दिनांक ५ व ६/६/२०१५ रोजी प्राप्त झाले असून त्यानुषंगाने दिनांक ६/६/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासनाने मॅगीच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्रीवर बंदीचे आदेश जारी केले आहेत. याव्यतिरिक्त विश्लेषणास घेतलेल्या मॅगीच्या ४६ नमुन्यांपैकी ०४ नमुने असुरक्षित तर २२ मिथ्याछाप घोषित केले आहेत.

(३) अन्न सुरक्षा मानके प्राधिकरण नवी दिल्ली यांनी दिनांक ०५/०६/२०१५ रोजी मॅगी विषयी बंदी आदेश जारी केला आहे व मॅगी संदर्भात महाराष्ट्रातील दि. ५ व ६ जून २०१५ रोजी प्राप्त असुरक्षित घोषित विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने देखील मॅगी नुडल्सच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्रीवर दि. ०६ जून, २०१५ पासून बंदी घातली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागातील गैरप्रकारांबाबत

(६) * **८०६७ श्री.रामनाथ मोते, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नागो गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागातील कर्मचारी शिक्षणाधिका-यांच्या बनावट सह्या करुन पत्र करीत आहेत असे नोव्हेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांना याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दि.११ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिले होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून केंव्हा प्राप्त झाला आहे,

(४) शिक्षणाधिकाऱ्यांची बनावट सही करुन पत्र करणा-या व जाणीवपूर्वक प्रकरणे आर्थिक मागणीच्या अपेक्षेने दाबून ठेवणा-या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, गैरप्रकार करणा-या व शासनाची दिशाभूल करुन फसवणूक करणा-या कर्मचा-यांना पाठीशी घालण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) खरे आहे.

(३), (४) व (५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना चौकशी करण्याबाबत कळविलेले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

मुंबईतील बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील २४ विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनीही प्रवेश नाकारल्याबाबत

(७) * **६६६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुनिल तटकरे, श्री.विजय गिरकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.किरण पावसकर, श्री.महादेव जानकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली येथील जेबीसीएन इंटरनॅशनल शाळेतील २४ विद्यार्थ्यांना फी न भरल्याचा शेरा दिल्याने अन्य शाळांनीही त्यांना प्रवेश नाकारल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेतील २४ मुलांना शाळेतून काढून तर टाकलेच पण या मुलांना अन्य शाळेत प्रवेशही मिळु नये अशी व्यवस्था शाळा प्रशासनाने केली असल्याने या मुलांचे भवितव्य अंधारात गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच, सदर प्रकरणात उपरोक्त शाळेकडून इमारतीचे बांधकाम चालू असताना विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी वार्षिक ६८,००० इतकी फी आकारली असून याच इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर इतर विद्यार्थ्यांकडून १,१७,००० रुपये फी आकारण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विद्यार्थ्यांच्या पालकांनी शालेय शिक्षण विभागाकडे दाद मागूनही त्यांना न्याय मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(६) असल्यास, शासनाने संबंधित शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४), (५) व (६) याप्रकरणी पालकांशी व व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात येवून त्याअनुषंगाने शाळा व्यवस्थापनाला सूचना देण्यात आल्या. तदनंतर पालकांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सदर याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने १२ विद्यार्थ्यांना त्याच शाळेत प्रवेश देण्यात आला आहे.

पुणे विभागातील ज्युनीअर कॉलेजच्या शिक्षकांच्या संचमान्यतेच्या प्रस्तावबाबत

(८) * ७५८३ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागातील ज्युनीअर कॉलेजच्या शिक्षकांच्या संचमान्यतेच्या प्रस्तावाची कामे प्रलंबित असल्यामुळे यावर्षी आणि पुढील वर्षीही शिक्षकांच्या पगाराच्या वितरणात अडचणी येण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्युनिअर कॉलेजमधील संबंधित शिक्षकांना त्यांचे पगार मिळत नसल्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम झाला असून त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांच्या संचमान्यतेच्या प्रस्तावाची कामे तातडीने पुर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) हे खरे नाही. संचमान्यतेमुळे कोणत्याही शिक्षकांचे वेतनावर विपरित परिणाम झाला नसून दैनंदिन कामकाज आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सर्व कनिष्ठ महाविद्यालयांची ऑनलाईन संचमान्यता मंजूरीसाठी माहिती भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासंदर्भात शिक्षण विभागाने नेमलेल्या समितीच्या अहवालाबाबत

(९) * ६९०४ श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुभाष झांबड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.रामराव वडकुते, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २८५४ ला दिनांक १२ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी कसे करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी शिक्षण विभागाने प्राथमिक विभागाचे संचालक श्री.महावीर माने यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्यात तामिळनाडू पॅटर्न राबवण्यात यावा अशी शिफारस या अहवालात करण्यात येऊन सदरील अंतरिम अहवाल शासनाकडे मंजूरी करीता पाठविण्यात आला असल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागाच्या समितीने सादर केलेल्या अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत, सदर शिफारशींबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार विदयार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणताच निर्णय किंवा कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक १८/०६/२०१५ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे.

(३) विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने एकूण ४४ शिफारशी केलेल्या आहेत. या शिफारशींमध्ये शालेय वेळापत्रकाबाबत. विद्यार्थ्यांनी शाळेत आणावयाचे साहित्य इ. बाबत शिफारशी आहेत.

(४) शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

इंद्रायणी नदी (पुणे) प्रदूषण मुक्त करण्यासाठी करावयाची उपाययोजना

(१०) * ६९३४ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेल्या इंद्रायणी नदीला प्रदूषण मुक्त करण्याचा निर्णय केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सी.पी.सी.बी.) माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीची पहाणी करुन प्रदूषण आणि त्यावरील उपायांचा विस्तृत आराखडा मंडळातर्फे तयार करण्यात येणार असून हा आराखडा केंद्र सरकार समोर सादर झाल्यानंतर राष्ट्रीय नदी सुधारणा प्रकल्पांतर्गत इंद्रायणी प्रदूषणमुक्त करण्यासाठी राज्याला निधी दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने इंद्रायणी नदी प्रदूषण मुक्तीसाठी केंद्राकडे पाठपुरावा करुन निधी मिळविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

तथापि, केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत आराखडा तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(३) आळंदी नगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावातील त्रुटी दुरुस्त करुन सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दि.६/५/२०१५ रोजी नगरपालिकेस दिले आहे. त्यानुसार नगरपालिकेने दि.२९/६/२०१५ रोजी सुधारीत प्रस्ताव सादर केला असून शासन मान्यतेनंतर केंद्र शासनास पाठविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या पुर्व प्राथमिक शाळा (नर्सरी/बालवाडी) साठी कायदा व धोरण तयार करणेबाबत

(११) * ८१०९ डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.आनंदराव पाटील, श्री.राजेंद्र मुळक, श्री.चंद्रकांत रघुवंशी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागाने नर्सरी व केजीचे आतापर्यंतचे झालेले सर्व प्रवेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे गोरगरीब व आर्थिक दुर्बल घटकातील हजारो मुले शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला असल्याचा धक्कादायक प्रकार माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या पुर्व प्राथमिक शाळा (नर्सरी/बालवाडी) साठी धोरण निश्चिती व कायदा तयार करणेसंबंधीच्या बाबींवर शासनस्तरावर सुरु असलेला शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी धोरण निश्चिती व कायद्याचे प्रारुप तयार करणेसंबंधी पुढे काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, राज्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे मोठया प्रमाणात फुटलेले पेव, अनेक शाळांचे संचालन, तेथील शैक्षणिक व भौतिक सुविधांचा अभाव, विभागाने मान्यता दिलेल्या व प्रत्यक्ष सुरु असलेल्या तुकडयांच्या संख्येतील मोठी तफावत, या तुकडयांवर विहित शैक्षणिक अर्हताधारक पदवीधर शिक्षक कार्यरत नसणे, त्यांना खात्याची मान्यता नसणे इ.बाबत पालकांच्या गंभीर तक्रारी पाहता प्रस्तुत बाबींवर शासनाचा विचार केव्हापर्यंत पुर्ण होईल ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबत धोरणनिश्चिती व कायदा तयार करण्याची बाब शासनस्तरावर विचारधीन आहे.

(४) राज्यातील शाळांना शिक्षण हक्क कायदयाचे निकष पाळणे बंधनकारक आहे. त्यानुसार शैक्षणिक व भौतिक सुविधांचे निकष तसेच शिक्षकांच्या नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता विहीत करण्यात आल्या आहेत. विद्यार्थी संख्येच्या आधारावर शिक्षकांची संख्या निश्चित करण्यात आली आहे.

राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत

(१२) * ७६७३ श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दत्तात्रय सावंत, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील माहे मार्च, २०१४ पर्यंतच्या वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील वाढीव पदांना मान्यता देण्यासाठी आवश्यक असलेली अतिरिक्त माहिती क्षेत्रिय यंत्रणेकडून मागविण्यात आलेली आहे. ती उपलब्ध होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

परभणी जिल्हा परिषदेंतर्गत ३ कोटी रुपयांची झालेली अनियमितता

(१३) * ७२६५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषदेतंर्गत भारत निर्माण प्रदुषित स्त्रोत असलेल्या गुणवत्ता बाधीत गावाच्या अंदाजपत्रकात गंभीर आर्थिक अनियमितता करीत जिल्हा परिषद स्तरावर ३ कोटी ५१ लक्ष रुपयांचे गैरप्रकार केल्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव (पाणी पुरवठा) मुंबई यांच्याकडे सन २०१५ दरम्यान लेखी तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी पुरवठा समित्या, अधिकारी व इतर यंत्रणांनी संगनमत करीत सुमारे ३ कोटी ५० लक्ष रुपयांची अनियमितता केल्या प्रकरणी वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्या चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच या कामी गैरप्रकार व नियमभंग करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचारी व यंत्रणाविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, दोषींना पाठीशी घालण्याचे धोरण राबविण्यात येत आहे काय ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी वरिष्ठ स्तरावरुन चौकशी करण्यात आली नाही. तथापि जिल्हा परिषद स्तरावर या प्रकरण तपासणी केली असता अनियमितता झाल्याचे दिसून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हयातील लासलगांव विंचुरसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत

(१४) * ८०४० श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील लासलगांव विंचुरसह १६ गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे मागणी करुनही सदर प्रश्न प्रलंबित असल्याने ऐन उन्हाळयात पाण्याचा अपव्यय होवून या १६ गावांसमोर पिण्याच्या पाण्याच्या यक्ष प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाशिक जिल्हयातील लासलगांव विंचूरसह १६ गावाच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाईपलाईनच्या नुतनीकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे हे खरे आहे. सदर योजनेची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली असून योजनेची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही संयुक्त ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे. सदर योजनेचे संकल्पित वर्ष २०३१ असून योजनेद्वारे किरकोळ दुरूस्ती वगळता पाणीपुरवठा सुरळीत सुरू असून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी करण्यात आलेली नाही.

(२) लासलगांव विंचूरसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची कामे ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आली असून दिनांक ०८/०२/२०१२ पासून योजनेची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही अध्यक्ष संयुक्त पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत करण्यात येत आहे. मूळ योजनेचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले असल्याने योजनेतील पाईपलाईनचे सक्षमीकरण करण्याविषयी योग्य त्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शाळेतील शुल्कवाढीला आळा घालणाऱ्या
कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

(१५) * ७७३८ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हरिसिंग राठोड, श्री.राजेंद्र मुळक, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळांच्या नफेखोर शुल्कवाढीला मर्यादा घालणारे कायदे असूनही खाजगी शाळांची मनमानी शुल्कवाढ रोखण्यास शासनाला अपयश येत असल्याची भावना शुल्कवाढीच्या मुदयावरुन पालकांनी तसेच फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन या संघटनेने मुंबईतील आझाद मैदानात दिनांक २५ एप्रिल, २०१४ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईसह राज्यातील बहुतांश खाजगी शाळांत प्राथमिक आणि पूर्व प्राथमिकचे प्रवेश घेताना संस्थाचालक, मुख्याध्यापकांकडून अनधिकृत देणगी घेतली जात असुन देणगी घेतल्याशिवाय प्रवेश मिळत नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे एप्रिल, २०१४ मध्ये शुल्क नियंत्रण कायदा लागू झाला मात्र शिक्षण विभागाने शुल्क नियंत्रण कायदा अद्याप कागदावरच ठेवून राज्यस्तरीय समिती स्थापन केली नसल्याचे ही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षण हक्क अधिकार कायद्यानुसार प्रत्येक बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळवून देण्याची तरतूद असतांना प्रवेशासाठी हजारो रुपयांचे शुल्क आकारले जात असुन त्यावर कोणाचाही अंकुश नसल्याने पालकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच शुल्कवाढीस आळा घालणाऱ्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) फोरम फॉर फेअरनेस एज्युकेशन या संस्थेकडून महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मध्ये काही सुधारणा सुचविणारे पत्र एप्रिलच्या सुमारास प्राप्त झालेले आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) २०११ अधिनियम दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आला असून दिनांक १.१२.२०१४ पासून संपूर्ण राज्यात त्याची अंमलबजावणी लागू केली आहे. तसेच सदर अधिनियमातील तरतूदीनुसार पुनरिक्षण समिती गठित करण्यात आली आहे.

कळंबोली (जि.रायगड) येथील भारतीय खाद्य निगमच्या गोदामावर टाकलेल्या धाडीत गहू व तांदळाच्या सुमारे २०० गोण्या जप्त केल्याबाबत

(१६) * ७८२३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (जि.रायगड) येथील भारतीय खाद्य निगमच्या (एफसीआय) गोदामातील धान्य लपवून ठेवलेल्या लोखंड बाजारातील गोदामावर पनवेलचे तहसिलदार यांनी दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून तेथून गहू व तांदळाच्या सुमारे २०० गोणी जप्त केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) मौजे कळंबोली स्टिल मार्केट प्लॉट नं.३२८ येथे तहसिलदार पनवेल यांनी छापा टाकला असता गहू व तांदूळाच्या एकूण २११ गोण्या व ॲपे टेम्पो जप्त केला आहे. सदरहू मुद्देमाल बेकायदेशिरपणे, चोरी अथवा काळाबाजार करण्यासाठी साठविण्यात आल्याचे आढळून आल्याने संबंधितांविरुद्ध कळंबोली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ॥ २२/२०१५ दिनांक २५.४.२०१५ रोजी जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस तपास सुरू असून एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील तहसिलदार यांनी बनावट रेशनकार्ड तयार केल्याबाबत

(१७) * ६७१० श्री.जयंत पाटील, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) तालुक्यातील तहसिलदार यांनी सहा हजार बोगस शिधापत्रिका तयार केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी, मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा.अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री गिरीष बापट, मा.विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील व धनंजय मुंडे आणि मा.काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या नावांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तहसिलदार यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) खामगाव तालुक्यात माहे मार्च-एप्रिल, २०१५ च्या दरम्यान मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी, मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा.अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री गिरीष बापट, मा.विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे-पाटील व धनंजय मुंडे आणि मा.कॉग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या नावे बोगस शिधापत्रिका आढळून आल्या आहेत.

(३) होय, चौकशी करण्यात आली आहे.

(४) तहसिलदार, खामगाव यांना महसूल व वन विभागाच्या दिनांक ६.६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

खामगांव (जि. बुलढाणा) मतदार संघातील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गाव योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत

(१८) * ८१३६ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५६ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)खामगांव (जि. बुलढाणा) मतदार संघातील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गांव योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबतची मागणी खामगांव मतदार संघाचे आमदार ॲड.आकाश पांडुरंग फुंडकर यांनी दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे पत्राद्वारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारपाण पट्टयातील गांवे वरील योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) खारपाण पट्टयातील १४० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दि. २/१२/२०१३ रोजी शासनाने प्रशासकीय मान्यता दिली असून, निविदा प्रक्रीया पुर्ण झाली असून, योजनेची ५० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे सदर योजनेत नविन गावे समाविष्ट करणे तांत्रिक व आर्थिकदृष्टया योग्य होणार नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात विद्युतीकरण व नविनीकरणाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१९) * ७४१३ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (मेडीकल) च्या विद्युतीकरण व नविनिकरणाकरीता सन २०१० मध्ये १ कोटी ८० लक्ष ९४ हजार ४५२ रुपयाच्या कामाला प्रशासकीय मंजूरी देण्यांत येवूनही अद्यापही निधी उपलब्ध न झाल्याने विद्यूतीकरणाचे कामे झाली नसल्यामूळे ४० कोटींची अद्ययावत उपकरणे नादुरुस्त होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

संस्थेतील सर्व वॉर्ड रुग्णालय व महाविद्यालय इमारत, वसतीगृह येथील विद्युतीकरणाच्या व नुतनीकरणांच्या कामांस एकूण रु. १,८६,६९,४५२/- इतक्या रक्कमेच्या तीन अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. सदरहू कामांना जुलै, २०१४ च्या पुरवणी मागणीमध्ये रु. १,६२,३४,०००/- इतका निधी मंजूर करण्यात आला असून सदरहू निधी डिसेंबर २०१४ मध्ये सा.बां.विद्युत विभागास हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्याद्वारे संस्थेमध्ये विद्युतीकरण व नुतनीकरणाची कामे सुरु आहेत.
(२) सदरहू निधी जुलै, २०१४ च्या पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

दहशतवादविरोधी व सुरक्षाविषयक अभ्यासक्रमाचा समावेश असलेले स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

(२०) * ७८०३ श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दहशतवादविरोधी व सुरक्षाविषयक अभ्यासक्रमाचा समावेश असलेले स्वतंत्र विद्यापीठ नागपूर अथवा पुणे येथे स्थापण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबीवर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या इमारतीची झालेली दुरवस्था

(२१) * ७८५६ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्याला शासकीय इमारतीची देखभाल दुरुस्तीसाठी शासनाने २५ कोटी रुपयांचा निधी देऊनही शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय रुग्णालयांच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

हृद्यरोग ऑपरेशन मध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टेंटची अधिक दराने विक्री करण्यात येत असल्याबाबत

(२२) * ६९७३ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हद्यरोग ऑपरेशन मध्ये वापरण्यात येणाऱ्या स्टेंटची मागणी वाढल्यामुळे राज्यातील रुग्णालयात आयात केलेले स्टेंट ३०० ते ७०० टक्के अधिक दराने विकून अडलेल्या रुग्णांची लूटमार करीत असून त्यावर वितरक-आयातदार सव्वाशे टक्के नफ्फेखोरी करीत असल्याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या दक्षता विभागाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई, पुणे व नाशिक येथील सहा वितरक व सात हॉस्पिटलांच्या केलेल्या सर्वेक्षणात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मूळ आयात किमतीपेक्षा अधिक किमतीच्या एमआरपीने स्टेंटची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर तसेच कार्डिअॅक स्टेंट विक्रीतून ३०० ते ७०० टक्के नफेखोरी करुन लूटमार करणाऱ्या रुग्णालयांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत स्टेंटची किंमत ही एम.आर.पी. पेक्षा जास्त आकारलेली नाही. तथापि, आयात केलेल्या किमतीपेक्षा जास्त आढळली.

सध्या कार्डियाक स्टेंटची किंमत औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत नियंत्रित होत असल्याने उत्पादक स्वत: किंमत ठरवू शकतो. तथापि, छापील एम.आर.पी. पेक्षा जास्त दराने विक्री करण्यास निर्बध आहे. अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या चौकशीमध्ये स्टेंट एम.आर.पी.पेक्षा जास्त किमतीने विकल्याचे आढळले नाही.

(२) होय.

(३) सध्या कार्डियाक स्टेंटची किंमत ओषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अतंर्गत नियंत्रित होत असल्याने उत्पादक स्वत: किंमत ठरवू शकतो

अन्न व औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ अंतर्गत नियंत्रित होत असल्याने उत्पादक स्वत: किंमत ठरवू शकतो

अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या चौकशीमध्ये स्टेंट एम.आर.पी पेक्षा जास्त किमतीने विकल्याचे आढळले नाही.

स्टेंटच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता अन्न व औषध प्रशासनाने राष्ट्रीय औषध मूल्य प्राधिकरणास दि. १८.०५.२०१५ च्या पत्रान्वये कार्डियाक स्टेंटच्या किमती नियंत्रणाखाली आणण्याबाबत तसेच Profit Margin ठरविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील ससून रुग्णालयात एकटया रुग्णाला दाखल करत नसल्याबाबत

(२३) * ७९४० ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील ससून रुग्णालयात एकटया रुग्णाला दाखल करुन घेत नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रुग्णाला रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णाची सेवा करण्याची जबाबदारी रुग्णालयाची असतांना रुग्णांची रात्रभर सेवा करण्यासाठी महिला मदतनिसाला ५०० रुपये तर २४ तास सेवा करण्यासाठी एक हजार रुपये मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांना द्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रुग्णाच्या कुटुंबाची आर्थिक लूट होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर विद्यापीठ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज येथील
अनेक प्रमुख पदे रिक्त असल्याबाबत

(२४) * ७३४१ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : तारांकित प्रश्न क्रमांक २६८५ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विद्यापीठ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ येथील अनेक प्रमुख पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) रिक्त पदी अनेक सेवानिवृत्तांना परत कामावर घेण्यात आले, हे खरे काय,
(३) असल्यास, यामुळे परिक्षा निकाल व इतर कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदे भरण्याकरिता काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.
(२) नाही. मात्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने विद्यापीठातील लिपिक संवर्गातील काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांसाठी दैनिक वेतनावर नियुक्त करण्यात आलेले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून सुरु आहे.

खाम नदी (औरंगाबाद) पात्रात विषारी व घातक रसायने सोडल्याने नदीपात्र प्रदूषित झाल्याबाबत

(२५) * ७४९२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद परिसरातील खाम नदीच्या पात्रात विषारी आणि घातक रसायने टँकरद्वारे सोडून प्रदूषण झाल्याचे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टँकरमधील घातक विषारी रसायने ज्या कंपनीमधून दिली जात होती, त्या कंपनी मालकाविरुद्ध अद्याप पोलिसांनी व प्रदूषण नियंत्रण महामंडळाने कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंपनीतील विषारी रसायन नदीपात्रात टाकून प्रदूषण करणा-याविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम : (१) हे खरे आहे.
(२) कंपनीच्या मालकाविरुद्ध कार्यवाही केली नाही, हे खरे आहे.

(३) पोलीस विभाग मार्फेत नदी पात्रात रसायन टाकणा-या टँकर विरुद्ध व वाहतुकीचे ठेकेदार विरुद्ध गुन्हा नोंदविलेला आहे. तसेच मंडळाने सदर रसायन मे.स्टर लाईट कंपनीचे बाय प्रॉडक्ट असल्याचे सिद्ध झाल्याने मे.स्टर लाईट टेक्नोलॉजीस्ट लि., एम.आय.डी.सी.वाळुंज या कारखान्याला कारणे दाखवा नोटिस दिनांक १३/३/२०१५ रोजी बजावलेली आहे व त्यानुसार आता सदर उद्योगाने प्रत्येक टँकरमध्ये जीपीआरएस यंत्रणा बसविलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(२६) * ७९२२ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.मनिषदादा जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय सेवकांच्या प्रलंबित न्याय मागण्यांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कार्यकारी संघ (स्टेट युनियम) नागपूर शाखा सोलापूर जिल्हा संघटनेच्या वतीने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ग्रंथालय अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या काय आहेत,

(३) तसेच सदर मागण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) सार्वजनिक ग्रंथालय सेवकांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे.

ग्रंथालय संचालनालयाने ग्रंथालय कर्मचा-यासाठी सेवानियम, सेवाशाश्वती संबंधी काढलेले परिपत्रक रद्द करावे. व्यंकप्पा पत्की अहवाल लागू करणे.

शासनाने २०१२ पासून ५०% वाढवलेले अनुदान देण्यात यावे.

कर्मचाऱ्यांना ऑनलाईन वेतन देण्यात यावे.

राज्यातील मान्यता प्राप्त कर्मचा-यांना नियमित दोन हप्त्याचे अनुदान ठरलेल्या वेळी देण्यात यावे, इत्यादी.

(३) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक हे शासकीय कर्मचारी नसल्याने त्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे शक्य नाही. तथापि, ग्रंथालय सेवकांच्या सेवाविषयक बाबींमध्ये एकसूत्रता येण्याकरीता सेवाविषयक सवलती व सुविधांविषयी

मार्गदर्शक तत्त्वे/सूचना ग्रंथालय संचालनालयाच्या दिनांक ८.५.२०१३ च्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आल्या आहेत.

मा.व्यंकप्पा पत्की समितीने केलेल्या शिफारशीपैकी बहुतांश शिफारशी पूर्ण केल्या आहेत.

१. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आलेली आहेत.

२. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात शासनाने वेळोवेळी वाढ केलेली आहे.

३. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी डिजिटल उपकेंद्र स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

४.जिल्हा/विभाग/राज्य ग्रंथालय संघ यांच्या अनुदानात वाढ करण्यात आलेली आहे.

५.संशोधन संस्था अनुदानात वाढ करण्यात आलेली आहे.

६.राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्यात येत आहे.

ग्रंथालयांना देण्यात येणा-या परिरक्षण अनुदानात वेळोवेळी वाढ केलेली आहे. दिनांक २१.२.२०१२ पासून परिरक्षण अनुदानात केलेली ५०% वाढ नियमानुसार देण्यात येत आहे. ग्रंथालयांना त्यांच्या खात्यात परिरक्षण अनुदान ऑनलाईन देण्यात येत आहे.

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना निधीच्या उपलब्धतेनुसार देय असलेले अनुदान देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याबाबत

(२७) * ७१८७ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात एपीएल कार्डधारकांसाठी पाच महिन्यांपासून रेशन दुकानावर धान्य नसताना अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच औरंगाबाद जिल्ह्यातील ३ लाख २२ हजाराहून अधिक एपीएल रेशन कार्डधारकांना मागील ८ महिन्यापासून धान्य मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव अनेकांना खुल्या बाजारातून महाग धान्य घ्यावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) एपीएल शिधापत्रिका धारकांसाठी पाच ते आठ महिन्यापासून रेशन दुकानावर धान्य नसताना अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांच्या धान्याचा काळाबाजार होत असल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, रेशनच्या धान्याचा काळाबाजार रोखण्याबाबत तसेच एपीएल शिधापत्रिकाधारकांना शिधा वाटप दुकानातून धान्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभ मिळण्यास पात्र नसणा-या रत्नागिरी व औरंगाबाद जिल्ह्यातील ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनाने आर्थिक भार सोसून पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात माहे मे, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले आहे. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये धान्य वाहतूकी दरम्यान वाहनचालकाने धान्याची दोन पोती चोरी केली असून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) रेशनच्या धान्याचा काळाबाजार रोखण्याच्या दृष्टीने नियमितपणे रास्तभाव दुकानांच्या तपासण्या करण्यात येऊन त्यामध्ये दोषी असलेल्यांविरुद्ध उचित कारवाई केली जाते.

फोर्ट (मुंबई) सिध्दार्थ महाविद्यालयातील दोन प्राचार्यामधील आणि त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना महाविद्यालयांमध्ये धक्काबुक्की झाल्याबाबत

(२८) * ७६२९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फोर्ट (मुंबई) सिध्दार्थ महाविद्यालयातील दोन प्राचार्यामधील आणि त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांना महाविद्यालयांमध्ये धक्काबुक्की झाल्याचे दिनांक १८.४.२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरु केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या प्रशासनावरुन मागील काही दिवसापासून दोन गटामध्ये वाद सुरु असल्याने सिध्दार्थ कॉलेजचे प्रभारी प्राचार्य म्हस्के यांना मीरा रोड येथील एका हॉटेलमध्ये बंदस्ति करुन ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वादावादीचा त्रास सदरहू महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

सदर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यास धक्काबुक्की झाल्याचे प्रभारी प्राचार्य यांनी दि. १८.०४.२०१५ व दि. १५.०५.२०१५ रोजी सह संचालक कार्यालयास पत्राद्वारे कळविले आहे अशी माहिती आहे.

(२) होय.

त्याबाबत महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य, श्री. मस्के यांनी दि. १८.०४.२०१५ व दि. १५.०५.२०१५ रोजी सह संचालक कार्यालयास कळविले आहे अशी माहिती आहे.

(३) सिध्दार्थ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाबाबत असलेल्या वादासंदर्भात विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व शैक्षणिक बाबींवर परिणाम होवू नये याकरिता मुंबई विद्यापीठास पत्र लिहिण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी नैदानिक चाचणी घेण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(२९) * ६८४५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा न घेण्याचा ५ वर्षापूर्वी शासनाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षा नसल्यामुळे शाळांची आणि विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढती आहे, शिक्षक काळानुसार अद्ययावत आहेत का याची पडताळणी केली जात नव्हती त्यामुळे परिक्षा न घेण्याच्या निर्णयामुळे गुणवत्ता खालावत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नैदानिक चाचणी सुरू करण्याची घोषणा मा. शालेय शिक्षणमंत्र्यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान येत्या शैक्षणिक सत्रापासून (२०१५-२०१६) शाळांमध्ये सुरू करण्याचे जाहिर करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नैदानिक चाचण्यांचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, नैदानिक चाचणी संदर्भात शासनाकडून कोणती अंमलबजावणी करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थांची परीक्षा न घेता सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) सन २०१५-१६ पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या मान्यताप्राप्त शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात प्रथम भाषा व गणित या दोन विषयाच्या ३ शैक्षणिक प्रगती चाचण्या घेण्यात येणार आहेत. या चाचण्यांमध्ये लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक अशा तीनही प्रकारच्या प्रश्नांचा समावेश असेल. याबाबत दि. २२/०६/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

या चाचण्या श्रेणीबध्द असणार आहेत. चाचणी क्र. १ (पायाभूत चाचणी) ही मागील इयत्तेच्या मुलभूत क्षमता व त्या त्या इयत्तेच्या प्रमुख क्षमतांवर आधारित असेल. चाचणी क्र. २ (संकलित मूल्यमापन-१) मध्ये मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमता आणि पहिल्या सत्रापर्यंतच्या क्षमता यावर आधारित असतील. चाचणी क्र. ३ (संकलित मूल्यमापन - २) मध्ये मागील इयत्तेपर्यंतच्या मुलभूत क्षमता, पहिल्या आणि दुसऱ्या सत्रापर्यंतच्या क्षमता यावर आधारीत प्रश्न असतील.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्हयातील असदगड किल्ल्याची झालेली दुर्दशा

(३०) * **७३८८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील जुन्या शहरात मोर्णा नदीकाठी तीनशे वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या असदगड किल्ल्याची अत्यंत दुर्दशा झालेली असून किल्ल्याच्या रस्त्याकडील एक भिंत बांधण्यात आली असून किल्ल्याच्या बुरुजाचा भाग ढासळला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोल्याचा वारसा असलेल्या असदगड किल्ल्याच्या विकासाकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किल्ल्याची पाहणी शासनाने केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार सदर किल्याचे तात्काळ नुतनीकरण करण्याबाबत तसेच निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय,
(२), (३) व (४) असदगड किल्ला हा राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून त्याचे जतन, संवर्धन व देखरेखीचे व्यवस्थापन हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, नागपूर मंडल यांचेकडून केले जाते. सदर किल्ल्यासाठी शासनाकडून निधी मिळविण्यासाठी ए.आर. च्या अंतर्गत वार्षिक अंदाजपत्रक बनविले गेले आहे. सदर प्रस्तावित अंदाजपत्रकानुसार कार्यवाही केली जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महागाव (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता ९ वी १० च्या उर्दू तुकडीच्या वाढीव प्रस्तावाबाबत

(३१) * ७८८१ श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे महागाव (जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता ९ वी १० उर्दू तुकडी वाढीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता आठवी ते इयत्ता बारावीचे वर्ग सुरू करण्यास शासन निर्णय दिनांक ११.०६.२००९ अन्वये परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यामध्ये संस्थांना क्रिडा इमारती बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३२) * ७१४८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यामध्ये क्रिडा संस्थांना इमारती बांधकामाकरीता देण्यात आलेला निधी इमारती बांधकाम न करता उचलण्यात आला असल्याच्या तक्रारी जिल्हास्तरावर प्राप्त झाल्या असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१२ ते २०१५ या वर्षात किती संस्थांना क्रिडा इमारती बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे,

(३) असल्यास, यापैंकी किती इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहेत व किती इमारती अपूर्णावस्थेत आहेत याची शासन माहिती देणार आहे काय,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व्यायामशाळा इमारत बांधकामावर सन २०१२-१५ या कालावधीमुध्ये एकूण ११७ संस्थांना बांधकामाकरिता धनादेशाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

(३) एकूण ११७ संस्थांपैकी ६३ पूर्ण व ५४ व्यायामशाळा इमारती बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगाव एज्यूकेशन सोसायटी, गोरेगाव (मुंबई) या शाळेने केजीच्या विद्यार्थ्यांकडून जास्त शुल्क वसूल केल्याबाबत

(३३) * ७३५३ श्री.विजय गिरकर, श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव पश्चिमेकडील गोरेगाव एज्युकेशन सोसायटी या दिल्ली बोर्डाच्या शाळेने केजीच्या विद्यार्थ्यांचे शुल्क सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात १२ पाल्यांच्या पालकांकडून जास्त शुल्क वसूल केले असून पालकांनी प्रशासनाकडे तक्रार केली असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी गोरेगावात मागील ४ ते ५ वर्षापासून अशी प्रकरणे वारंवार होत असल्याचे आढळून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाढीव फी न भरल्याने शाळेकडून प्रवेश देणार नसल्याचे सांगण्यात आले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती निर्माण झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये तसेच दुजाभावाची वागणूक देणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे अंशत: खरे असून गोरेगाव एज्युकेशन सोसायटी या शाळेच्या पालक शिक्षक संघाने शाळा इ. १ ली करीता एक रकमी फी भरणे बाबत सक्ती करीत असल्याचे दिनांक २५/४/२०१५ चे पत्र शिक्षण निरीक्षक (पश्चिम), मुंबई यांचेकडे प्राप्त झाले आहे.

(२) होय. फी वाढीबाबत तक्रारी आहेत.

(३), (४) व (५) गोरेगाव एज्युकेशन सोसायटी पालक शिक्षक संघाने उपरोक्त नमूद केलेल्या तक्रारी अनुषंगाने शिक्षण निरीक्षक (पश्चिम), मुंबई यांनी सदर शाळेला दिनांक १०/६/२०१५ च्या पत्रान्वये १ ली ची फी दोन सत्रात घेण्याचे निर्देश देवून विद्यार्थ्यांना वर्गामध्ये बसविण्याच्याही सूचना संबंधितांना दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या टीवायबीकॉम परिक्षेला बसलेला एका बोगस विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या विशेषपथकाने पकडले असल्याबाबत

(३४) * ७०२६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या टीवायबीकॉम परिक्षेला बसलेल्या एका बोगस विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या विशेषपथकाने पकडल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चेंबूर येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील परिक्षा केंद्रावर सदरहू बोगस विद्यार्थ्याला पकडण्यात आल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषापितांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणांचा पोलीस तपास सुरु असून दोषीवर कार्यवाही केली जाईल.

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई

(३५) * ६८०८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात चार मोठी धरणे आणि बारा लघु पाटबंधारे प्रकल्प असूनही आदिवासी गावे आणि पाड्यांसाठी दोनशेहून अधिक पाणीपुरवठा योजनांवर करोडो रुपयांचा निधी खर्च होऊनसुध्दा नागरीकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील डोळखांब, खर्डी, कसारा, किन्हवली, वासिंद, धराई या गांवाना व अनेक पाड्यांना मार्च ते जूनपर्यंत दरवर्षी पाणी टंचाई जाणवते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांची तसेच पाड्यांची कायम पाणीटंचाई दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) अंशत: खरे आहे.

शहापूर (जि. ठाणे) तालुक्यतील २३ गावे व ९० पाड्यांना मार्च ते जून, २०१५ या कालावधीत १६ टँकरने पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. मात्र त्यात डोळखांब, खर्डी, कसारा, किन्हवली, वासिंद व धसई या गावांचा समावेश नाही.

(३) शहापूर तालुक्यात मागणी आधारित पुरवठा या तत्वानुसार १८३ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या असून त्यापैकी १२९ नळ पाणी पुरवठा योजना व ५४ साधी विहीरीची कामे सुरु आहेत. सदरच्या योजना पूर्ण करण्यासाठी चौकशी करण्यात आली असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सुनावण्या घेतल्या असून पाठपुरावा सुरु आहे. पाणी टंचाई कायम स्वरुपी दूर करण्यासाठी टप्याटप्याने नळ पाणी पुरवठा योजना व प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील शाळांतील पटसंख्या १० पेक्षा कमी असल्याने शाळा बंद करण्याबाबत

(३६) * ७७१४ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येत्या शैक्षणिक वर्षापासून ज्या प्राथमिक शाळेमध्ये १० पेक्षा कमी पट असलेल्या शाळा बंद करण्याच्या धोरणात्मक निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील एकूण २८३७ शाळांपैकी जिल्हा परिषदेच्या ५६३, नगर परिषदेची १ व विनाअनुदानित ४ शाळा अशा एकुण ५६८ शाळांतील पटसंख्या १० पेक्षा कमी असल्याने या शाळा बंद कराव्या लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शाळांची पटसंख्या नियमानुसार कमी आहे त्या शाळा प्रामुख्याने पोलादपूर, महाड, श्रीवर्धन, म्हसाळा, माणगांव, सुधागड, खालापूर, कर्जत या डोंगराळ भागातील असल्याने सदरहू शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बंद करण्यात यावयाच्या ५६८ शाळांतील विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था कोणत्या शाळेत करण्यात येणार आहे तसेच बंद करण्याचे प्रस्तावित केलेल्या शाळातील शिक्षकांनी एकूण संख्या किती आहे व त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने मार्केटिंग फेडरेशनकडून केलेल्या धान खरेदीबाबत

(३७) * ८२३३ श्री.राजेंद्र जैन : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मार्केटिंग फेंडरेशनकडून धान खरेदी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४६ खरेदी केंद्रामार्फत या धानाची खरेदी केली, हे खरे आहे काय,
(३) एकूण ४ लाख ३३ हजार ६४४ विंक्टल धान खरेदी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) या धानाची रक्कम ५८ कोटी ९८ लाख ११ हजार २५६ पैंकी शासनाकडून ३ कोटी ७५ लाख रुपयाची हुंडी रक्कम अद्यापर्यंत मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(५) ही रक्कम शेतकऱ्यांना मिळण्यास होणाऱ्या विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत राज्यात मार्केटिंग फेडरेशन मार्फत एकूण ४२३ मंजुर खरेदी केंद्रापैकी २८८ खरेदी केंद्रांवर धान खरेदी करण्यात आलेली आहे.
(३) व (४) खरे नाही.

मार्केटिंग फेडरेशन मार्फत दि. ३० जून, २०१५ पर्यत राज्यात १६,३८,७९८.३९ क्विंटल धानाची खरेदी झाली असून त्यापैकी सादर केलेल्या १०,४०,८९८.४७ क्विंटल धान्य खरेदीच्या हूंडी देयकापोटी रु. १३१,१५,३२,०७२/- इतकी रक्कम प्रदान करण्यात आली असून धान खरेदीचे कोणतेही देयक (हूंडी) प्रलंबीत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

जे.जे. रुग्णालय (मुंबई) येथील रुग्णांची होत असलेली गैरसोय

(३८) * ८१२० श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.संदिप बाजोरिया, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जे.जे. रुग्णालय, मुंबई येथील औषधाचा तुटवडा, उपचारासाठी टाळाटाळ, डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी ठरलेल्या वेळत येत नाहीत त्यामुळे रुग्णांचे हाल होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णाच्या संख्येत दिवसेदिवस वाढ होत असतानाच व्यवस्थापनाकडून कोणतीच पावले उचलली जात नसल्याने अनेक गरजू रुग्णांना खाटेऐवजी जमिनीवर पथारी पसरुन उपचार घ्यावे लागत आहे हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिरुर (ता.वैजापूर) येथील गावांना मन्यार धरणातून पाणी पुरवठा करण्याबाबत

(३९) * ७२४६ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर (ता.वैजापूर) येथील भटना धरणात गेल्या दहा वर्षात पाण्याचा थेंबही साचलेला नाही, अवाढव्य खर्च करुनही ते निकामी ठरल्याने आता राष्ट्रीय पेयजल योजनेवर ४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे यासाठी धरणाला लागूनच दोन विहिरी खोदण्यात आल्या असून त्या विहिरीनांही पाणी नाही त्यामुळे टँकरद्वारे विहिरीत, विहिरीतून पाईप लाईनद्वारे टाकीत व टाकीतून नळाद्वारे गावाला दर पंधरा दिवसाआड पाणी पुरविले जात असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावाला मन्यार धरणातून पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

शिवुर पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीत आहे. दोन्ही विहिरींचे खोलीकरण मे, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले असून गावाला आवश्यक असणारे पाणी विहिरीद्वारे उपलब्ध झाले आहे. सन २०१५ च्या उन्हाळयात तीव्र पाणी टंचाई असूनही एका विहिरीद्वारे २.५० लक्ष लिटर व उर्वरित ०.८० लक्ष लिटर पाणी टँकरद्वारे दि. १५.४.२०१५ पासून सुरु केले व दुसऱ्या विहिरीचे खोलीकरण पूर्ण झाल्यानंतर दि. ९.६.२०१५ पासून टँकर बंद करण्यात आले. योजनेतून प्रायोगिक तत्वावर डिसेंबर, २०१४ पासून पाणी पुरवठा सुरु आहे. दोन्ही विहिरीद्वारे शिवुर गावाला शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) भटाणा धरणातील योजनेच्या दोन्ही विहिरींना पुरेसा पाणी साठा प्राप्त झाल्याने शिवुर गावाला शुध्द व पुरेसा पाणी पुरवठा सुरु आहे. त्यामुळे मन्याड धरणातून पाणी पुरवठा सुरु करण्याची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उघडकीस आलेले गुणवाढ प्रकरण

(४०) * ६९५५ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात उघडकीस आलेल्या गुणवाढ प्रकरणात संपूर्ण ७ लाख उत्तरपत्रिका तपासण्याचा निर्णय पोलीसांनी घेतला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने येथील गुणवाढ प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय,

(२) व (३) ज्या विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेत खोडतोड करुन गुणवाढ झाल्याचे समितीच्या तपासात सिध्द झाले त्या विद्यार्थ्यांविरुध्द पोलीसात तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. पोलीसांकडून पुढील तपास सुरु आहे.

मुंबईत असुरक्षित आणि निकृष्ट अन्नामुळे होणाऱ्या आजारांमुळे बालकांचा बळी जात असल्याबाबत

(४१) * ७१०२ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत असुरक्षित आणि निकृष्ट अन्नामुळे होणाऱ्या आजारांमुळे दररोज ५० बालकांचा बळी जात असल्याचे एका सर्वेक्षणातून माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(३) अद्याप, उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही. अशा प्रकारची घटना निदर्शनास आलेली नाही.

(२) अन्न व औषध प्रशासनाच्या बृहन्मुंबई कार्यालयातर्फे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांमार्फत बाजारात / उत्पादकांकडे अन्न सुरक्षा व मानके अधिनियम अंतर्गत नियमितपणे अन्न आस्थापनांच्या तपासण्या करुन नमुने घेतले जातात. नमुने असुरक्षित / अप्रमाणित आढळल्यास संबंधिताविरुध्द अन्न सुरक्षा कायद्यातील तरतुदीनूसार कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि. रायगड) तालुक्यातील निजामपूर येथील काळ नदी प्रदूषित झाल्याबाबत

(४२) * **८३३३ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील निजामपूर विभागातील विळे भागाड औद्योगिक वसाहती मधील पॉस्को महाराष्ट्र स्टील कारखान्याचे दूषित सांडपाणी काळ नदीत सोडले जात असल्याने काळ नदीकाठच्या नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार काळ नदी प्रदुषित होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम : (१) तालुका आरोग्य अधिकारी, ता माणगांव, जि.रायगड यांचे अहवालानुसार हे खरे नाही.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/०४/२०१५ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या पाहणीच्या वेळी उद्योगातील प्रक्रिया केंद्र चालू असल्याचे आढळले. उद्योगातील प्रक्रियाकृत सांडपाण्याचा पूर्ण प्रक्रिया करुन पुनर्वापर केला जात असल्याचे तसेच परिसरात कोठेही सांडपाणी उघडयावर वा नदीपात्रात सोडल्याचे आढळून आले नाही. सदर उद्योगातून निर्माण होणारा घातक घनकचरा मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लि. तळोजा यांचेकडे पुढील प्रक्रियेसाठी वेळोवेळी पाठविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दुध, बाटलीबंद पाणी, शीतपेये किंवा अन्य खाद्यपदार्थ "एमआरपी" पेक्षा जास्त किंमतीस विकत असल्याबाबत

(४३) * **७१६८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुध, बाटलीबंद पाणी, शीतपेये किंवा अन्य खाद्यपदार्थ "एमआरपी" पेक्षा जास्त किंमतीस विकणारे राज्यातील मल्टिप्लेक्स हॉटेल व ढाब्याबाबत तक्रारी आल्यास विक्रेत्यांच्या विरोधात तत्काळ आजामीनपात्र गुन्हा नोंदवण्याबाबतचा कायद्यात बदल करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घेण्यात आलेल्या प्रस्तावाबाबत निर्णयाची मंत्रिमंडळात मान्यता घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात आली आहे,
(३) असल्यास, केलेल्या अंमलबजावणी तपशील काय,
(४) अद्याप, कोणताच निर्णय किंवा अंमलबजावणी झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य यांनी कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.
(२), (३) व (४) नियंत्रक, वैध मापन शास्त्र यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाची कायदेशीर तपासणी करण्यात येत आहे.

तुकडया अनुदानास पात्र करुन अनुदान देणेबाबत

(४४) * ८१९४ श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक २८८५ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१३-१४ मध्ये माध्यमिक शाळांचे/तुकडयांचे मुल्यांकन होवून त्यापैकी दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे १६२ शाळा अनुदानास पात्र झाल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबरोबर मुल्यांकन झालेल्या तुकडया अनुदानास पात्र झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तुकडया अनुदानास पात्र करुन त्यांची आर्थिक तरतुद करण्याविषयी शासनाने काणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) होय.
(३) तुकड्या अनुदानाच्या प्रस्तवावर आयुक्त (शिक्षण), म.रा.पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. पात्र १६२ शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन तरतुद उपलब्ध करुन देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य मराठी भाषा, विकास संस्था आणि साहित्य-संस्कृती मंडळ या दोन संस्थांच्या विलीनिकरणाबाबत

(४५) * ६७७८ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी भाषा, विकास संस्था आणि साहित्य-संस्कृती मंडळ या दोन संस्थांच्या विलीनीकरणा संदर्भात शिफारशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या डॉ.श्रीपाद जोशी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने आपला अहवाल दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने केलेल्या शिफारशींचे स्वरुप काय आहे आणि शासनाने त्यावर काय निर्णय घेतले आहेत,

(३) अद्याप समितीच्या शिफारशींवर निर्णय घेतले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आणि या संदर्भात केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण न करता त्यांचे अस्तित्व कायम राखले जावे, अशी शिफारस उक्त समितीने केली असून सदर शिफारशीच्या अनुषंगाने, या दोन्ही संस्थांच्या स्थापनेची उद्दिष्टे विचारात घेता दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करणे योग्य होणार नाही, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यातील घाटी रुग्णालयासाठी डायलीसीसची मशिन खरेदी करण्याबाबत

(४६) * ७४५७ श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटी रुग्णालय (जि.औरंगाबाद) येथील जिल्हा नियोजन समितीने डायलिसीसची पाच यंत्रे मंजूर केली आणि त्यासाठी निधीही मंजूर केला असून माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये निधी मिळाल्यानंतर ३१ मार्चपूर्वी ही खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात वैद्यकीय शिक्षण विभाग अयशस्वी ठरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या दोन यंत्रावरच रुग्णांची डायलिसिस करावे लागत आहे तसेच १ डायलीसीस मशीन १ वर्षापासून बंद असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच घाटी रुग्णालयात मागील दोन वर्षापासून मुत्रपिंड विकार तज्ञाचे पद रिक्त असून इतर तज्ञांना कामे करावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आणखी पाच डायलिसिस यंत्रे खरेदी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) वित्तीय वर्ष २०१४-२०१५ मध्ये संस्थेमार्फत ०५ हेमोडायलेसिस यंत्र खरेदीसाठी संचालनालय स्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. परंतु वित्त विभाग शासन परिपत्रक दिनांक ११.२.२००० अन्वये १५ फेब्रुवारी अथवा तदनंतर खरेदीवर निर्बंध असल्यामुळे खरेदी पूर्ण होऊ शकली नाही.

(२) सन २०१३-२०१४ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ०२ नविन यंत्रांवर रुग्णांचे डायलेसिस सुरू आहे. तर जुने सन २००८ मध्ये घेण्यात आलेले यंत्र तंत्रज्ञानाच्या कालबाह्यतेमुळे बंद आहे.

(३) हे खरे नाही.

शासनाच्या राजीव गांधी योजनेंतर्गत ०२ डायलेसिस तंत्रज्ञांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच संस्थेमध्ये नियमित दोन मुत्रपिंड विकार तज्ञाची पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही संस्थास्तरावर सुरू आहे.

(४) वित्तीय वर्ष २०१५-२०१६ मध्ये संस्थेस ०५ हेमोडायलेसिस यंत्रे जिल्हा वार्षिक योजनेमधून खरेदी करण्यासाठी संस्थास्तरावर तांत्रिक मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने संस्थेमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास निधी वितरण व प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद चंद्रपूरच्या नवखडा-तपाळ पाणी पुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फिडरचे प्रलंबित असलेले काम

(४७) * **७२८४ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील (ता.नागभीड) जिल्हा चंद्रपूर अंतर्गत नवखडा-तपाळ पाणी पुरवठा योजनेचे (Watar treatment plant) राज्य शासनाने एक्सप्रेस फीडर मंजुर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एक्सप्रेस फीडरची एकूण डिमांड रक्कम ४३ लक्ष ५७ हजार रुपये खर्चाच्या मंजुर अंदाजपत्रक खर्चापैकी जिल्हा परिषद चंद्रपुर द्वारा महावितरण विभागास देखभाल दुरुस्ती १.३% रक्कमेचा भरणा करणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अधिक्षक, अभियंता, महावितरण, गडचिरोली यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) यांना दिनांक ९ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंदाजे ५६ हजार रुपयांच्या रक्कमेचा महावितरणला जिल्हा परिषद चंद्रपूरकडुन भरणा न झाल्यामुळे नवखडा-तपाळ या १७ गावांन पुरवठा करणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या योजना एक्सप्रेस फीडर चे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

(२) होय, तथापि एक्सप्रेस फीडरच्या कामाची मूळ अंदाजित किंमत ४३.५७ लक्ष होती. परंतु सदर कामाचे रु. ६०,९३,३८४/- इतक्या किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक प्राप्त झाल्याने, त्यानुसार महावितरण विभागास १.३ % रकमेचा भरणा करणे आवश्यक आहे. तथापि, सदर खर्च हा सुपरव्हिजन शुल्काचा असून, एकूण रक्कम रु. ६१,५३,६१७/- महावितरण विभागास भरणे अनिवार्य आहे.

(३) नाही.

(४) व (५) अंशत: हे खरे आहे.

नवखडा-तपाळ पाणीपुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फीडरच्या मूळ अंदाजित रकमेवरील सुपरव्हिजन शुल्क रु. ५६,४६२-/ इतके आहे. तथापि, सदर कामाचर सुधारित किंमत रु. ६०,९३,३८४/- चे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. ब्रम्हपूरी यांचेकडून प्राप्त झाल्याने, त्यानुसार महावितरण विभागास सुपरव्हिजन शुल्क १.३ % रकमेसह एकूण रक्कम रु. ६१,५३,६१७/- भरणे अनिवार्य आहे. तथापि, सदर रकमेची तरतूद जिल्हा परिषद, चंद्रपूर उपलब्ध नसल्यामुळे सदर रकमेचे मागणी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, च्रदंपूर यांचेकडे करण्यात आली आहे. सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर सदर पाणी पुरवठा योजनेच्या एक्सप्रेस फीडरचे काम करण्यात येईल.

तूरडाळीचे भाव आवाक्यात आण्ण्याबाबत करावयाची उपाययोजना

(४८) * ७६४० प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांनी तूरडाळ ५ हजार प्रतिक्विंटल भावाने विकल्यानंतर मागील महिनाअखेरीस म्हणजेच माहे जानेवारी ते मार्च, २०१५ च्या दरम्यान बाजारात तूरडाळीचे भाव वाढविण्यासाठी साठेबाज व्यापाऱ्यांनी कृत्रिम तुरडाळीचा तुटवडा निर्माण केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील डाळीचे भाव प्रतिक्विंटल ८ हजार २०० ते ९ हजार ५०० रुपयांपर्यंत असतांना आता हेच दर प्रतिकिलो १०० ते १०५ रुपयांपर्यंत पोहचले असल्याने गरीबांना डाळ विकत घेणे आवाक्याबाहेर गेले असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरील डाळीचे भाव आवाक्यात आणण्याबाबत तसेच साठेबाज व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यात गुटखा विक्री होत असल्याबाबत

(४९) * ७०६५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात गुटखा विक्रीबंदी कायदा असतानाही शहर तसेच ग्रामीण भागातील गाव, वाडीवली तसेच तांडे येथे राजरोसपणे गुटखा विक्री सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन गुटखा विक्री करणारे साठेबाज व विक्रेते यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) व (२) हे खरे नाही. तथापि, अन्न व औषध प्रशासनाने उस्मानाबाद जिल्हयात माहे एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत ०६ ठिकाणी धाडी टाकून सुमारे ६२,७२,५१९/- रु. किमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त केला असून, ०५ व्यक्ती व ०१ अज्ञात व्यक्ती अशा एकूण ०६ व्यक्तींवर संबंधित पोलिस स्टेशनमध्ये भा.द.वि. कलम २७२, २७३, १८८ व ३२८ अंतर्गत प्रथम खबरी अहवाल (एफआयआर) नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी चौकशी सुरु असून, चौकशी पूर्ण होताच संबंधितांवर खटले दाखल करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयात अनेक प्राचार्य पीएचडी धारक नसल्याबाबत

(५०) * ७५४३ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ४९८६९ ला दिनांक १४ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापिठाअंतर्गत असलेल्या ७४० हून अधिक महाविद्यालयांपैकी ४६१ महाविद्यालयांमध्ये पुर्णवेळ प्राचार्य नसल्याचे तसेच ३० महाविद्यालयातील प्राचार्य हे पीएचडी पदवी धारक नसल्याचे दिनांक २ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पीचडी पदवी धारक नसताना देखील सदर ३० महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नियुक्तीस मुंबई विद्यापिठाने मान्यता दिलेली असल्याने त्याबाबत मुंबई विद्यापिठाचे सिनेट बैठकीत तीव्र आक्षेप नोंदवूनही त्याबाबत अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही हेही त्याच सुमारास (माहे एप्रिल, २०१५) निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील सर्व प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यामध्ये काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

उच्च शिक्षणाशी संबंधीत शासकीय १० महाविद्यालयांपैकी ४ व अशासकीय अनुदानित १८४ महाविद्यालयांपैकी ३९ अशा एकूण ४३ महाविद्यालयांमध्ये पूर्णवेळ प्राचार्य नाहीत हे निदर्शनास आले आहे. तसेच ११ अनुदानित महाविद्यालयात पीएचडी पदवी धारक नसलेले प्राचार्य पदावर कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशतः खरे आहे.

मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार अशासकीय अनुदानित ११ महाविद्यालयांमध्ये पीएचडी पदवीधारक प्राचार्य नाहीत. तथापि, सदर महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नेमणूका वेळोवेळीच्या युजीसीच्या अधिनियमांच्या व शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार करण्यात आलेल्या आहेत.

(३) सदर ११ अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांच्या नेमणूका वेळोवेळीच्या युजीसीच्या अधिनियमांच्या व शासन निर्णयांच्या तरतुदीनुसार करण्यात आल्याने पुढे कोणती कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील दगडखाण कामगारांच्या मुलांसाठीच्या पाषाण शाळांना विशेष शाळेचा दर्जा मिळण्याबाबत

(५१) * ८८६६ **श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दगडखाण कामगारांच्या मुलांसाठीच्या पाषाण शाळांना विशेष मुलांच्या शाळेचा दर्जा मिळावा ही प्रमुख शिफारस असलेला सरकारी समितीचा अहवाल ८ महिन्यापासून राज्य शासनाकडे पडून असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्याच्या अंमलबजावणीनंतरही दगडखाण कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटलेला नसल्याने तब्बल ४५ हजारांहून अधिक मुलांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) राज्यातील दगडखाण क्षेत्रातील कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार विद्यार्थ्यांसाठी पर्यायी शिक्षणाची व्यवस्था न करता त्यांचे इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण नियमित शाळेत होणे आवश्यक आहे. यानुसार दगडखाण कामगारांच्या मुलांना नियमित शाळेत दाखल करण्यात येते.

(४) उद्भवत नाही.

जळगांव जिल्ह्यातील नियमित विज देयके भरणा-या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन अनुदान मिळणेबाबत

(५२) * **९७१० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची वीज देयके नियमित भरणाऱ्या ग्रामपंचायतींना देण्यात येणारे ३३ कोटी रुपयाचे प्रोत्साहन अनुदान गेल्या चार वर्षापासून दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर अनुदान त्वरीत देणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

(२) व (३) शासनामार्फत निधीच्या उपलब्धतेनुसार गेल्या चार वर्षात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत देखभाल व दुरुस्ती प्रात्साहन अनुदानाचे वाटप जिल्हा परिषद, जळगांव यांना करण्यात आलेले आहे व सदर अनुदान जि.प. मार्फत सामुहिक पाणी पुरवठा/ प्रादेशिक पाणी पुरवठा यावरील नियमित वीज देयकांसाठी खर्च करण्यात आलेले आहे.

जिल्हा परिषदेकडील जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून ग्रामपंचायतींना वार्षिक वीज देयकांच्या ५० % निधी प्रोत्साहन अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, जळगांव यांच्यामार्फत प्रगतीपथावर आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे आरक्षित रिक्त जागांवर जादा प्रवेश शुल्क घेतल्याबाबत

(५३) * ९८०६ श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ५४८७ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक वर्ष सन २००८-२००९, २००९-२०१०, व २०१०-२०११ या वर्षात अनिवासी भारतीयांच्या पाल्यासाठी असलेल्या आरक्षित प्रवेशामध्ये रिक्त जागांवर प्रवेशित विद्यार्थीकडून निर्धारित शिक्षण शुल्कापेक्षा अवास्तव जास्तीचे शिक्षण शुल्क घेतले गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असलेल्या रिक्त जागांवर गुणानुक्रमे यादीतील विद्यार्थ्यांना डावलून प्रवेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक सत्र सन २०११-२०१२ मध्ये गुणवत्ताधारकांना डावलून व्यवस्थापनाच्या नातेवाईकांना प्रवेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(४) डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथे स्नात्कोत्तर अभ्यासक्रमांसाठी अवैधरित्या ११ विद्यार्थ्यांना प्रवेश केल्याबद्दल, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकद्वारे ११ लक्ष रुपयांचा या महाविद्यालयावर दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती अशा प्रकारच्या तक्रारी होवून सुध्दा त्यावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, संबधीत प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण असलेल्या संबधीत दोषीवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) खरे नाही.

(४) होय.

(५) व (६) सदर प्रकरणी शिवाजी शिक्षण संस्था, संचालित, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाची अधिष्ठाता, वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली होती, परंतु, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाने कोणतीही नियमबाह्य कृती केलेली नसल्याचे त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेले आहे.

राज्याचे नाव उज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना गट "अ" व "ब" मधील पदावर नियुक्ती देण्याबाबत

(५४) * १००३० श्री.विजय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ५४७९ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे नाव उज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना दिनांक ९ डिसेंबर, २०१० रोजी शासन सेवेत थेट गट "अ" व "ब" मधील पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या खेळाडूंमधील वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या मागणीच्या अनुषंगाने ४ वर्षापासून प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाची तपासणी पूर्ण करुन त्या अनुषंगाने अत्युच्च गुणवत्ताधारक गट "अ" व "ब" मधील वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेमध्ये पदक मिळविलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना शिवछत्रपती पुरस्कारासाठी पात्र ठरविण्याच्या मागणीबाबत पुनर्विचार करुन अशा प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, तद्नुषंगिक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) केंद्र शासनाच्या रेल्वे विभाग व राष्ट्रीयकृत बँकेत ज्याप्रमाणे खेळाडूंसाठी बोर्ड आहे त्याच धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा बोर्ड निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग दिनांक २१ जुलै, २००७ अन्वये अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेमधील मैदानी व बैठ्या खेळांच्या सरावासाठी शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना संबंधित राष्ट्रीय स्पर्धेपूर्वी १० दिवस सोमवार ते शुक्रवार दुपारी ३.३० नंतर कार्यालय सोडण्याची सवलत सद्यस्थितीत देत असून सरसकट सर्व खेळांसाठी १० दिवसांच्या सवलती ऐवजी ३० दिवसांची सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सर्व खेळांसाठी वर्षभर सरावासाठी सवलत देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(७) असल्यास, उक्त प्रलंबित निर्णयाबाबत कोणती ठोस कार्यवाही करण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(४) अशा प्रकारचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(५) क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी व ॲथेलेटिक्स या चार खेळांसाठी १० दिवसांच्या सवलती ऐवजी ३० दिवसांची सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) सर्व खेळांसाठी वर्षभर सरावासाठी सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्हयातील १६३ गावांमध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई

(५५) * १००४१ श्री.गुरुमुख जगवानी, श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील १६३ गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पाणी टंचाई असलेल्या गावात पाणी टंचाई निवारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अदयाप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्हयात सद्यस्थितीत ११२ गावांना पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

(२) होय.

(३) पाणी टंचाई निवारणार्थ खाजगी विहीर अधिग्रहण ३१, टँकरने पाणी पुरवठा करणे ६ व नवीन विंधन विहीर कूपनलिका घेणे ११४ अशा एकूण १५२ उपाययोजना पाणी टंचाई असलेल्या गावांत घेण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास घटकातील विद्यार्थी आरटीई प्रवेश हक्कापासून वंचित असल्याबाबत

(५६) * ८२६८ श्री.प्रकाश गजभिये, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनंत गाडगीळ, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जर्नादन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राने आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास असलेल्या घटकातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हक्क कायदा जारी केला त्यावेळी त्यात शाळा आणि शिक्षकांची जबाबदारी या भागातील कलम १२ (१) (क) यात वंचित दुर्बल गटासाठी २५ टक्के आरक्षणाची तरतूद आणि पहिलीच्या एंट्री पॉइन्टचा उल्लेख केला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार खासगी शाळांमध्ये आर्थिक दुर्बल आणि वंचित घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के जागावर प्रवेश देणे बंधनकारक आहे या करिता राज्यात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते मात्र यात शासनाला राखीव ७० टक्के जागांवरील पुरते प्रवेश करता आले नसल्याने याबाबत पूर्वप्राथमिक प्रवेशाचा गोंधळ होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर कठोर कारवाईचे आदेश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी दिल्याचे निदर्शनास आले, नागपूर जिल्ह्यातील सीबीएस.ई व इंग्रजी माध्यमाच्या किती शाळांनी आरटीई अंतर्गत शासनाच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला आहे,

(४) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यात आरटीई अंतर्गत एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या दुर्बल घटकांतील वंचित पालकांच्या मुलांसाठी २५ टक्के आरक्षण ठेवण्याचे आदेश असताना शाळेत १०० टक्के प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) तसेच आर्थिक व सामाजिक दृष्टया मागास असलेल्या घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यातंर्गत (आरटीई) आरक्षित २५ टक्के जागांवर प्रवेश देणे बंधनकारक असतांना, शासनाच्या अनास्थेमुळे पुण्यातील साडेपाच हजारांहून अधिक विद्यार्थी आरटीई प्रवेश हक्कापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच पूर्व प्राथमिक वर्गात आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शुल्काचा परतावा दिला जाणार नसल्याचे मा.शिक्षणमंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची रक्कम मागील वर्षापेक्षा ११०० रुपयांनी यंदा कमी केली असल्यामुळे शैक्षणिक खर्चाचा भार आता गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांवरच पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व तद्नुषंगाने विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(९) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) नागपूर जिल्ह्यातील शाळांनी सरसकट प्रवेश देण्याचे नाकारण्यात आलेले नाही.

(४) नाही.

(५) पुण्यामध्ये इ.१ ली स्तरावरील १४८० व पूर्वप्राथमिक स्तरावरील १७७५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले असून इ.१ ली स्तरावरील उर्वरित १६९३ व पूर्वप्राथमिक स्तरावरील १५०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) याविषयी न्यायालयात प्रकरण चालू आहे.

(७) सन २०१४-१५ या वर्षाच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीची कमाल मर्यादा मागील वर्षापेक्षा रु. ११४७/- ने कमी असली तरी त्याचा भार विद्यार्थ्यांच्या पालकांवर पडणार नाही.

(८) प्रवेश देण्याबाबत आवश्यकत्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(९) प्रश्न उद्भवत नाही.

नोकरीत कायम करण्याकरिता प्राध्यापकाकडून महाविद्यालयातील प्राचार्याने लाच घेतल्याबाबत

(५७) * ७३०५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंडाळा ता.नागभीड जि.चंद्रपूर,येथील संत हरिदास कनिष्ठ कला महाविद्यालयातील प्राचार्य श्री.मुनघाटे यांनी तासिका तत्वावर काम करणा-या प्राध्यापकाकडून नोकरीत कायम करण्याकरिता १० लाख रुपयाची मागणी केली व त्यापैकी २ लाख रुपयांची लाच घेताना दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर संस्थेने प्राचार्य श्री. मुनघाटे यांना निलंबित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुदानित पात्र शाळांना व वर्ग तुकड्यांना आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत

(५८) * ७५२६ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७५६ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानास पात्र म्हणून शासन आदेश निर्गमित केलेल्या १३४३ शाळांच्या फेरमुल्यांकनास एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान शासनाने स्थगिती दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त १३४३ शाळा अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अनुदानास पात्र म्हणून शासन आदेश निर्ममित केलेल्या शाळा व वर्गतुकडयांना आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) शासन पत्र दिनांक १७ मार्च, २०१५ अन्वये त्रयस्थ समितीमार्फत सुरू असलेली फेरतपासणीचे कामकाज थांबविण्यात आले आहे.

(२) शासनाने यापूर्वीच सदर शाळा अनुदानास पात्र घोषित केलेल्या आहेत. त्रयस्थ समितीने फेरतपासणीत पात्र/अपात्र केलेल्या शाळांसंदर्भात शाळेच्या यु-डायस नुसार शाळेत शिकणा-या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड क्रमांकासह यादी सादर करण्याच्या सूचना आयुक्त (शिक्षण) यांना देण्यात आल्या आहेत.

(३) अनुदानास पात्र ठरविण्यात आलेल्या शाळांमधील वर्ग/तुकड्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी करावयाची उपाययोजना

(५९) * ९५८१ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भीषण पाणीटंचाई लक्षात घेऊन हजारो वाडयावस्त्यांना सुमारे दोन हजार टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या जिल्ह्यात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्याची भीषण पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय.

दिनांक १.०६.२०१५ रोजी राज्यात २१३४ गावे व २७९१ वाड्यांना एकूण २५२० टँकर पाणीपुरवठा करण्यात येत होता.
(२) दिनांक १ जून, २०१५ रोजी राज्यातील जिल्हानिहाय गावे / वाड्या यांना टँकरद्वारे पिण्याच्या पाणीपुरवठ्याची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	जिल्हा	गावे	वाड्या	टँकर्स
१	ठाणे	३२	९६	२१
२	रायगड	४८	२२३	३४
३	रत्नागिरी	८४	१८६	२३
४	पालघर	४७	१००	३०
५	नाशिक	१२५	१९२	७९
६	धुळे	१	०	१
७	नंदुरबार	१	०	१
८	जळगाव	३	०	१
९	अहमदनगर	२५३	१०९१	३३१

१०	पुणे	३०	१९५	३५
११	सातारा	५३	१६४	४७
१२	सांगली	९	४८	१०
१३	सोलापूर	८	१६	८
१४	औरंगाबाद	४०३	१५	५४७
१५	जालना	२४०	५६	३००
१६	बीड	३७८	२८४	४७३
१७	परभणी	१७	५	२२
१८	हिंगोली	८	१	१४
१९	नांदेड	१३३	८७	२११
२०	उस्मानाबाद	१०२	३	१३८
२१	लातूर	६७	२४	८९
२२	अमरावती	७	०	९
२३	अकोला	१	०	१
२४	वाशिम	२९	१	३१
२५	बुलढाणा	१७	०	२७
२६	यवतमाळ	२४	४	२४
२७	नागपूर	१४	०	१३
	एकूण	**२१३४**	**२७९१**	**२५२०**

(३) राज्यातील सर्व जिल्ह्यांचा दिनांक ३०.६.२०१५ पर्यंतचा टंचाई कृति आराखडा तयार करण्यात आला असून आवश्यकतेनुसार त्यातील उपाययोजना घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जनतेला चालू वर्षी अन्नधान्याचा तुटवडयाच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागणार असल्याबाबत

(६०) * **८४९५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला चालू वर्षी अन्नधान्याचा तुटवडयाच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागणार असून सुमारे १६ लाख टन धान्य कमी पडणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये अथवा त्यासुमारास राज्य शासनाच्या निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भातील नेमकी वस्तुस्थिती काय आहे,

(३) पुरेशा अन्न धान्याअभावी जनतेची उपासमार होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत अथवा येत आहे ?

श्री. गिरीश बापट : (१), (२) व (३) हे खरे नाही.

ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागातील शासन मान्य खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांच्या वेतनेत्तर अनुदानाबाबत

(६१) * ८०५५ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यकक्षेत येणाऱ्या शासन मान्य खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांची संख्या किती आहे,

(२) सन २०१३-१४ साठी या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यासाठी किती रक्कम शासनाकडून प्राप्त झाली होती,

(३) यापैकी किती शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यात आले असून त्या शाळांची यादी व त्यांना दिलेल्या वेतनेत्तर अनुदानाची रक्कम किती होती,

(४) ज्या शाळांचे देय वेतनेत्तर अनुदान अदयापही देण्यात आलेले नाही, त्या शाळांची नावे काय आहेत व रक्कम किती आहे,

(५) शासनाकडून अनुदान प्राप्त होऊनही वेतनेतर अनुदानाचे वाटप न करण्याची कारणे काय आहेत,

(६) सन २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेले वेतनेत्तर अनुदान किती आहे व त्याचे वाटप केव्हा करण्यात आले आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) विभाजनापूर्वी ठाणे जिल्हयात खाजगी माध्यमिक शाळांची संख्या ५१० इतकी होती. सद्यःस्थितीत माध्यमिक शाळांची संख्या ३७८ इतकी आहे.

(२) व (३) सदर शाळांसाठी रुपये ७,९०,७७,०००/- इतकी रक्कम देण्यात आली आहे. त्यापैकी रुपये ७,४४,३८,४०८/- इतके वेतनेत्तर अनुदान ४७७ शाळांना वाटप करण्यात आले आहे.

(४) उर्वरीत ३३ शाळांनी निकषांची पूर्तता न केल्याने त्यांना अद्याप वेतनेत्तर अनुदान देण्यात आलेले नाही.

(५) ज्या शाळांनी बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार १० मानके पूर्ण केलेली नाहीत. तसेच हमीपत्र/बंदपत्र दिलेले नाहीत. त्या शाळांना वेतनेत्तर अनुदान देण्यांत आलेले नाही.

(६) सन २०१४-२०१५ मध्ये प्राप्त झालेले रुपये ७,९०,७७,०००/- इतके वेतनेत्तर अनुदानापैकी आतापर्यंत रुपये ७,४४,३८,४०८/- इतके वेतनेत्तर अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील इंटरनॅशनल स्कुल व्यवस्थापकाने केलेल्या फी वाढीबाबत

(६२) * १०१६० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली येथील इंटरनॅशनल स्कुल व्यवस्थापकाने केलेल्या फी वाढी विरुध्द दिनांक १५ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास पालकांनी निदर्शने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालकांनी केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये ट्रस्टींनी राज्य शासनाचे कोणतेही नियम पाळणार नसल्याचा धक्कादायक खुलासा केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मंत्री, शालेय शिक्षण यांनी या प्रकरणाची विभागामार्फत चौकशी करण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) अंशत:खरे आहे.

(३) होय.

(४) होय.

(५) या प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सदर शाळेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये रु. २६,०००/- इतकी फी वाढ केली होती. तथापि पालकांच्या विनंती व तक्रारीनुसार सदर फी रु. २१,७००/- इतकी कमी करण्यात आल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले आहे.

तसेच स्टींग ऑपरेशनबाबत पालकांनी केलेल्या लेखी निवेदनानुसार संबंधित शाळेस नोटीस बजावली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात "कायम" शब्द काढलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत

(६३) * ७५९५ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८५ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :

सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात "कायम" शब्द काढलेल्या शाळा माहे, मे २०१५ अखेरपर्यंत अनुदानास पात्र झाल्या असून त्यांना अनुदान दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळांना अनुदान देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) दिनांक २५ जून, २०१३ पर्यंत अनुदानास पात्र घोषित ठरविलेल्या शाळांना अनुदान सुरू झालेले आहे. उर्वरीत पात्र शाळांना निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अनुदानासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोअरवेल खणून भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतांवर अतिक्रमण झाल्याबाबत

(६४) * ६९१० श्री.अनंत गाडगीळ, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र भूजल (व्यवस्थापन व विकास) कायदा असतानांही गावोगावी हजार-हजार फुट बोअरवेल खणून भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतांवर होत असलेल्या अतिक्रमणांवर आळा घालण्यासाठी ६० मीटर खाली बोरवेल खणण्यास, किंवा उपसा करण्यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकारणाने निर्बंध घातले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी संस्थात्मक तसेच लोकशिक्षणात्मक व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाही, या संदर्भात निर्बंध घालण्याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणा मार्फत कार्यवाही सुरु आहे.

(२) महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व अधिकाऱ्यांच्या क्षमता बांधणीसाठी नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांसाठी विभागीयस्तरावर एकत्रित व उर्वरित ४ विभागांतील जिल्ह्यांसाठी जिल्हास्तरावर मिळुन २३ कार्यशाळांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणे ग्रामस्तरावर कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन त्यात अधिनियमाच्या सामुहीक वाचनासाठी ग्राम विकास विभागामार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे तालुकास्तरावर लोकप्रतिनिधी, उपभोक्ते व अधिकाऱ्यांच्या लोकशिक्षणासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सर्व शाळांचे क्रिडा मुल्यांकन करणेबाबत शासनाने घेतलेला निर्णय

(६५) * ८१११ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ५२६३ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांचे देशातील महाविद्यालयांप्रमाणेच नॅशनल ॲसेसमेंट ॲण्ड ॲक्रीडिएशन कौन्सिल (नॅक) च्या धर्तीवर मुल्यांकन करण्यासाठी स्टेट ॲसेसमेंट ॲण्ड ॲक्रीडिएशन कौन्सिल (सॅक) स्थापन करण्याच्या विचाराधिन बाबीवरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने पुढे कोणती निर्णय घेण्यात आला व यासंदर्भात सॅक अधिनियम व असेसमेंट मॅन्युल तयार करण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(३) नसल्यास, शाळांचा दर्जा उंचावणेचे दृष्टीने अत्यंत महत्वाच्या अशा सदरहु प्रकरणी कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१), (२) व (३) सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

प्रगती मंडळ संचलित जागृती नाईट हायस्कूल माझगांव (मुंबई) या शाळेच्या स्थलांतराबाबत

(६६) * **७६६५ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रगती मंडळ संचलित जागृती नाईट हायस्कूल माझगांव (मुंबई) या शाळेचे ठाणे बाळकूम येथे स्थलांतराबाबत शिक्षण उपसंचालकाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना परवानगी न देण्याबाबतची कारणे काय आहेत,

(३) असंघटीत क्षेत्रातील कामगार वर्गाचे स्थलांतर लक्षात घेऊन मुंबईतील रात्र शाळांचे मागणीप्रमाणे उपनगरात व ठाणे जिल्हयात स्थलांतर करण्याबाबत शासनाची काय भुमिका आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) बंद झालेल्या शाळेचे स्थलांतर करण्याची तरतूद नाही.

(३) शाळा स्थलांतराबाबतचे प्रस्ताव प्रचलित धोरणानुसार तपासण्यात येतात.

मेडीकल, मॅनेजमेंट व इंजिनिअरींग परिक्षेबाबत

(६७) * **७२७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मेडीकल, मॅनेजमेंट व इंजिनिअरींगच्या सन २०१६ च्या प्रवेशासाठी फक्त राज्य सरकारच्या सामाईक परिक्षेव्दारेच (एमएचसीईटी) प्रवेश देण्याबाबत शासनाने सन २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाप्रमाणे निम्नस्तरावर प्रत्यक्षात अधिसुचना, आदेश प्राप्त न झाल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक संस्था यांच्यात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर परिक्षा शासनाच्या परिक्षेद्वारेच पार पाडण्यात येत असल्याबाबतचे आदेश त्वरीत काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) वैद्यकीय अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २७.०८.२०१३ रोजी घेतला आहे. तथापि, व्यवस्थानशास्त्र व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाबाबत असा कोणताही निर्णय शासनाने अद्याप घेतलेला नाही. राज्य सरकारच्या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारेच शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्रवेश देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही चालू आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमधील रसायन तंत्रज्ञान संस्था या विद्यापीठातील शिक्षक वर्गाची सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत

(६८) * ८०४६ श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३४५८ ला दिनांक १२ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई येथील अध्यापकांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अद्यापही प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यापीठातील अध्यापकांच्या वेतन आयोगाच्या थकबाकीबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास शासनास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई या संस्थेचे कुलगुरु यांनी दिनांक ८/१/२०१५ रोजी शासनास पत्र दिले आहे.

(३) व (४) रसायन तंत्रज्ञान संस्था मुंबई या संस्थेसह राज्यातील शासकिय व अशासकिय अनुदानीत अभियांत्रिकी व इतर पदवी महाविद्यालयांतील / संस्थातील अध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीपैकी २० टक्के राज्य शासन व ८० टक्के थकबाकी केंद्र शासनाकडून देणे अपेक्षित आहे. या पैकी राज्य शासनाने २० टक्के थकबाकीची रक्कम अदा केली आहे. केंद्र शासनाकडील ८० टक्के थकबाकीची

रक्कम अदा करण्यासंदर्भात वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने पुरवणी मागणी सादर करण्याबाबत विभागास अवगत केले होते. वित्त विभागाच्या निर्देशानुसार विभागाने ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कत संबंधितांना अदा करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीकरीता पुरवणी मागणी वित्त विभागास सादर केली आहे.

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने इयत्ता ४ थी व ७ वीच्या घेतलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेबाबत

(६९) * ७७२३ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेने इयत्ता ४ थी व ७ वीच्या घेतलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेच्या मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेत चूका आढळून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

कांदिवलीच्या (मुंबई) लोखंडवाला फाऊंडेशनच्या शाळेने पाचवीत शिकणाऱ्या मुलीला पुन्हा त्याच वर्गात बसविल्याबाबत

(७०) * ७८२४ श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षणाच्या मोफत व सक्तीच्या कायद्यानुसार पहिली व आठवी पर्यंत कोणत्याही बालकास मागे ठेवता येणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकता येणार नाही असा स्पष्ट नियम असतानाही कांदिवलीच्या (मुंबई) लोखंडवाला फाऊंडेशनच्या शाळेने पाचवीत शिकणाऱ्या मुलीला पुन्हा त्याच वर्गात बसविल्याबाबत माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुलीच्या पालकांनी शाळा शिक्षण हक्क कायदयाचे उल्लंघन करीत असल्याची तक्रार शिक्षण निरीक्षक, मुंबई महानगरपालिका, शिक्षणाधिकारी यांच्याकडे दाखल केली असता या दोन्ही यंत्रणांनी एकदा नव्हेतर दोनवेळा हा प्रकार कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याचे स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात दाखल करुन घेण्याचे आदेश देवूनही शाळेने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित शाळेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) व (२) होय.

(३) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

दैठणा (जि.परभणी) येथील पाणीपुरवठा योजनेत झालेला भ्रष्ट्राचार

(७१) * ६७१४ श्री.जयंत पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २८०१ ला दिनांक १९ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दैठणा (जि.परभणी) येथील पाणी पुरवठा योजनेच्या कामात झालेल्या गैरप्रकारांची तपासणी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गुणवत्ता परिक्षण पथक, मुंबई यांचे मार्फत पूर्ण झाली आहे काय,

(२) तपासणी पूर्ण झाली असल्यास अधिक्षक अभियंता यांचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(३) अद्याप तपासणी पूर्ण झाली नसल्यास सदर तपासणी किती मुदतीत पूर्ण केली जाईल ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गुणवता परिक्षण पथक, मुंबई यांचा अहवाल प्राप्त झाला असून, सदर अहवालाच्या निष्कर्षानुसार संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे निर्देश दि. ४.७.२०१४ रोजी जिल्हा परिषदेला देण्यात आले असून याबाबतचा अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत २३६ महाविद्यालयांपैकी १६८ महाविद्यालयात प्राचार्यांची पदे रिक्त असल्याबाबत

(७२) * **७४२६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठा अंतर्गत २३६ महाविद्यालयांपैकी १६८ महाविद्यालयात प्राचार्यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक ३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर विदयापीठाअंतर्गत प्राचार्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू पदे केव्हापर्यंत भरणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे.

गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत २३६ महाविद्यालयांपैकी अशासकीय अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची १२ पदे रिक्त असून, अशासकीय कायम विना अनुदानित महाविद्यालयात प्राचार्यांची १४९ पदे रिक्त आहेत.

(२), (३), व (४) प्राचार्यांची पदे भरण्याबाबत विद्यापीठस्तरावरुन कार्यवाही सुरु असुन, विद्यापीठाने प्राचार्य पद भरती संबंधी, संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांच्या सभेचे आयोजन करुन तसेच परिपत्रकाद्वारे संबंधितांना वारंवार अवगत केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

घरगुती वापराचे गॅस सिलींडर व रेशन दुकानातील धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

(७३) * ६९९७ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, ॲड.अनिल परब, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अन्नधान्य वितरण कार्यालयातील (एफडीओ) विविध गैरप्रकारांची प्रकरणे समोर येत असून घरगुती वापराचे गॅस सिलींडर व रेशन दुकानातील धान्याचा काळाबाजार करण्याऱ्यांविरुध्द शिधावाटप विभागाने मुंबई शहरात व राज्यात विशेष मोहिम व धाडसत्र माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्नधान्याच्या काळाबाजार रोखण्याकरीता दक्षता समित्यांवरील नेमणूका करण्यात शासनास व प्रशासनास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने काळाबाजार रोखण्यासाठी दक्षता समित्यांवरील नेमणूका करण्याबाबत तसेच रेशनचा काळाबाजार करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

तथापि, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत धान्याचा काळाबाजार करणाऱ्याविरुध्द नियमित तपासण्या करण्यांत येतात.

(२) हे खरे नाही.

राज्य शासनाच्या दिनांक २३ जानेवारी, २००८ च्या शासननिर्णयानुसार ग्राम, तालुका, नगरपालिका, महानगरपालिका व जिल्हास्तरावर दक्षता समित्या गठीत केल्या आहेत. या सर्व समित्या स्थायी स्वरुपातील असून, ज्या समित्यावरील अशासकीय सदस्यांना कार्यकाळ पुर्ण झालेला आहे. अशा समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्य नव्याने नेमणूका करणेबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) रेशनचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक रास्तभाव दुकानाच्या वर्षातून किमान दोनदा किंवा सहा महिन्यातून किमान एकदा नियमित तपासण्या करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी, २०१२ व दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ नूसार मा.मंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.) यांचे अर्धशासकीय पत्रान्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठातील पुर्नमुल्यांकनाचे निकाल वेळेवर लावण्याबाबत

(७४) * ७३२४ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठातील पुर्नमुल्यांकनाचे निकाल परिक्षा झाल्यानंतर ४५ दिवसाच्या आत लागत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेचा निकाल हा पुढील सत्राच्या १ दिवस आधी लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिक्षेचा निकाल हा वेळेत लावण्याचे अनिवार्य असताना संबंधित शिक्षण प्रशासक याकडे दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, पुर्नमुल्यांकनाचे निकाल वेळेवर लावून विद्यार्थ्यांना मानसिक त्रास कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.

(२), (३), (४), (५) व (६) पुनर्मुल्याकंनाची निर्देश क्रमांक ५/२००४ चे २४/२०१४ मध्ये ४५ दिवसाच्या आत निकाल लावण्याची कोणतीही तरतूद नाही. तथापि, विद्यार्थ्याची पुढील सत्राची परीक्षा सुरु होण्यापूर्वी पुनर्मुल्याकंनाचा निकाल लावण्यासंबंधी विद्यापीठ स्तरावर सर्वोतोपरी प्रयत्न केले जातात. पुनर्मुल्याकंनाचे निकाल लवकरात लवकर लावण्याकरीता विद्यापीठाने पावले उचललेली असून Onscreen Revaluation ही पध्दत नव्याने अवलंबलेली आहे. या पध्दतीनुसार सद्य:स्थितीला प्रायोगिक तत्वावर पुनर्मुल्याकंनाचे निकाल घोषित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, बीड यांच्या गैरकारभाराबाबत

(७५) * ७४७८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी केलेल्या मनमानी व गैरकारभाराबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ विभागीय मंडळ, मुंबई यांनी दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी बीड येथे जावून चौकशी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद, बीड यांच्या मनमानी व गैरकारभाराबाबत शिक्षण संचालक माध्यमिक पुणे यांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर यांना चौकशीचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण संचालक माध्यमिक, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसार चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, तद्नुसार दोषीविरुध्द तसेच जिल्हापरिषद, अध्यक्ष, बीड यांनी दिनांक १८ मे, २०१५ रोजी दिलेल्या पत्रावर चौकशी अधिकाऱ्यांनी कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.,) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांना त्यांचे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये चौकशी करण्याबाबत कळविण्यात आले होते.

(३) व (४) तथापी, या प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेऊन आयुक्त शिक्षण, यांनी त्यांच्या दिनांक २७.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये विभागीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य, माध्य. व उच्च माध्य.शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्य चौकशी समिती गठीत केली होती. त्या गठीत केलेल्या समितीमध्ये उपसंचालक कार्यालय औरंगाबादमधील शिक्षण उपनिरीक्षक यांना सदस्य म्हणून घेण्यात आलेले असल्याने विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद यांच्यास्तरावर पुन्हा दुसरी चौकशी करण्याची आवश्यकता राहीली नाही.

आयुक्त शिक्षण, यांनी नियुक्त केलेल्या त्रिसदस्य चौकशी समितीने त्यांच्या दिनांक २४.४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये आयुक्त शिक्षण यांनी अहवाल सादर केला. प्राप्त अहवालामधील प्राथमिक निष्कर्ष विचारात घेऊन आयुक्त शिक्षण यांनी त्यांच्या दिनांक ४.६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प.बीड यांना निलंबित केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दोडामार्ग (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील आंबडगावात नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत

(७६) * ७१८८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथून जवळ असलेल्या आंबडगावातील लोकांना पाणीपुरवठा करण्यासाठी नळपाणी योजनेवर सुमारे २० लाख रुपये खर्च करुनही पाणी मिळत नसल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी मिळत नसल्यामुळे येथील ग्रामस्थाना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आंबडगावातील नागरीकांना पाणीपुरवठा नियमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे खरे नाही.

(३) मौजे आंबडगाव, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग या गावातील ५ वाडयांना नळ पाणी पुरवठा योजना, ६ सार्वजनिक विहीरी व ३ हातपंपाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच आंबडगाव साटेलकर वाडी येथे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासाण्याची शक्यता असल्याने साटेकरवाडी येथे सार्वजनिक विहिर खोल करणे व गाळ काढणे हे काम सुरु करणेत आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई व ठाणे जिल्ह्यात जादा दराने दूध विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(७७) * ८९०७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे शहरामध्ये दूध पिशवी थंड करण्याच्या नावाखाली प्रत्येक दुकानदार लाखो ग्राहकांकडून एक ते दोन रुपये प्रत्येक दुधाच्या पिशवी मागे अतिरिक्त घेत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई व ठाणे शहरात १४० लाख लीटर दूध पुरवठा होत असून त्यानुसार महिन्यात सुमारे ८०० कोटी रुपये इतका काळा पैसा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठराविक दूधाची विक्री करताना वारंवार कारवाईला सामोरे जावे लागत असल्याने या दूधाचीच विक्री बंद करण्याचा निर्णय विक्रेत्यानी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकारास आळा घालण्यासाठी वैध मापनशास्त्र प्रशासनाने कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(५) याबाबत सदर प्रशासनाने कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२), (३), (४) व (५) एमआरपी पेक्षा जास्त दराने वस्तुंची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुध्द वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार दुधाची M.R.P. पेक्षा अधिक दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

नियंत्रक, वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य यांनी कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची कायदेशीर तपासणी करण्यात येत आहे.

देशातील ऑक्झलरी नर्सिंग ॲड मिडवायफरी (एएनएम) संस्थांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून केंद्र सरकारच्या शिष्यवृत्तीत कोटयवधी रुपयांचा झालेला अपहार

(७८) * ६८६५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल तटकरे, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील ऑक्झलरी नर्सिंग ॲड मिडवायफरी (एएनएम) अभ्यासक्रमांच्या १ हजार ५२० संस्थापैकी ५०६ संस्था एकटया महाराष्ट्रात चालविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही वर्षापासून वैद्यकीय द्रव्ये व औषधी विभागामार्फत दोन ते साडेतीन वर्षाचे एएनएम व जीएनएम (जनरल नर्सिंग ॲंड मिडवायफरी) हे नर्सिंग अभ्यासक्रम चालविले जात असून सदरहू अभ्यासक्रमांना महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल तर्फे आणि नंतर इंडियन नर्सिंग कौन्सिल नवी दिल्ली तर्फे वार्षिक परवानगी दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात चालविल्या जात असलेल्या ५०६ संस्थांनी गेल्या २ ते ३ वर्षात सदरहू संस्थांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून केंद्र सरकारची कोटयावधी रुपयांची शिष्यवृत्ती लाटण्यात आली असल्याची बाब अलिकडेच निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) सन २०१०-११ ते २०१४-१५ या वर्षात गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक संस्थांनी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलमार्फत रितसर मंजूरी न घेता एएनएम/लीएनएम अभ्यासक्रमाची विना परवाना महाविद्यालये सुरु करुन विद्यार्थीनींची बोगस संख्या व बोगस हजेरीपट दाखवून कोटयावधी रुपयाची शिष्यवृत्ती व सरकारी अनुदान घेवून मोठया प्रमाणात गैरव्यवहार केल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी संबंधित संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) अद्याप कोणतीच चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) नाही.

(४) नाही.

(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबत

(७९) * ७३९६ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २८२९ ला दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १० जून, २०१२ मध्ये अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा ठराव करुन मंजिप्राच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ च्या संचालक मंडळाच्या १२७ व्या बैठकीत अकोला शहर पाणीपुरवठा योजना ३० वर्षासाठी मजिप्राने हस्तांतरित करुन घेण्यावर एकमत झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.आयुक्त अकोला मनपा यांनी पम्पींग मशिनकरिता ४ कोटी व वितरण व्यवस्थेकरिता ६ कोटी असे एकूण १० कोटी रुपये देण्याचे मान्य करुनही अद्यापी या योजनेबाबत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेबाबत शासनाच्या दुर्लक्षतेमुळे शहराला अनियमित पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(५) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) नाही. तथापि, त्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १२७ च्या बैठकीमध्ये आला असता अकोला महानगरपालिका व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमध्ये सामंजस्य करार (Relationship Agreement) करणे आवश्यक असल्याने सदर कराराचे स्वरुप कसे असावे व संस्थात्मक व वित्तीय संरचना कशी असावी यासाठी Transaction Advisory म्हणून तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली.

(२) सदर योजनेचे हस्तांतरण स्विकारावयाचे झाल्यास सदर योजना चालविण्यासाठी काही तात्काळ दुरुस्त्या करणे तसेच देखभाल दुरूस्तीसाठी रुपये ११.८४ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्याबाबत अकोला महानगरपालिकेने अनुकूलता दर्शविली होती.

(३) नाही. सद्यःस्थितीत अस्तित्वातील पाईप लाईनद्वारे अकोला महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) अकोला शहर पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याची बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात आली होती. त्यावर पाणीपट्टी वसुली कमी असणे, हिशोबबाह्य पाण्याचे प्रमाण ५० % असणे तसेच अकोला महानगरपालिकेकडे असलेली म.जी.प्रा.ची थकबाकी इ.बाबी विचारात घेता संचालक मंडळाने सदर योजना म.जी.प्रा.च्या आर्थिक हिताची नसल्याने योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन घेणे योग्य ठरणार नाही असा निर्णय घेतला आहे.

राज्यात आरटीई कायदयानुसार शिक्षण सक्तीचे करण्यात आले असलेतरी ६४ हजार २६३ शाळेत नियमित मुख्याध्यापक नसल्याबाबत

(८०) * ९२८१ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरटीई कायदयानुसार शिक्षण सक्तीचे करण्यात आले असले तरी ६४ हजार २६३ शाळेत नियमित मुख्याध्यापक नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सर्व शाळेत मुख्याध्यापकाची पदे नियमितपणे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) बालकांचा मोफत शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १९, २५ व शेडयूल नुसार प्राथमिक शाळांमध्ये १५० पेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास १ मुख्याध्यापक मंजूर करण्यात येते. त्यानुषंगाने इयत्ता १ ली ते ७ वी किंवा इयत्ता ८ वी ची पटसंख्या १५० पेक्षा जास्त झाल्यास १ मुख्याध्यापकाचे पद मंजूर करण्यात येते. त्यानुषंगाने १५० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांना कायद्यानुसार मुख्याध्यापकाचे पद अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ मेडिकल कॉलेजमध्ये कर्मचारी व डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत

(८१) * ७१४९ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ मेडिकल कॉलेजमध्ये कर्मचारी व डॉक्टरच्या मोठया प्रमाणात पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

एमकेसीएलला नियमबाह्य कंत्राटे देण्यात आल्याबाबत

(८२) * **७३५९ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचे नियम धुडकावून ८ विभागांनी माहिती तंत्रज्ञान सेवा पुरविण्यासाठी निविदा न मागविता नियमबाह्य पद्धतीने १८ कोटी ४७ लाख रुपयांचे कंत्राट महाराष्ट्र ज्ञान महामंडळाला दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष म्हणजे सेवा पुरविण्यासाठीचा करार संपुष्टात आल्यानंतर एमकेसीएल ला ही कंत्राटे देण्यात आली असल्याने हा व्यवहार संशयास्पद असल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एमकेसीएल ला कामे देताना कोणकोणत्या पद्धतींचा अवलंब करायचा यासंबंधीचा शासन निर्णय जारी करण्यात आला असूनही नियमबाह्य पद्धतीने कंत्राट दिल्याचे कळते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) या कंपनीची स्थापना शासनाने केली आहे. विविध प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अखत्यारितील कामे सदर महामंडळास निविदा न मागविता दिली असल्याचे महालेखापालाच्या प्रारुप परिच्छेद अहवालाद्वारे निदर्शनास आले आहे.
(२) नाही.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.मातंत्र ३७००/(१३२/२०००)/भाग-ड/तांशि-३ दि.६ जून, २००१ अन्वये MKCL ही शासनाने कंपनी अधिनियमाखाली स्थापित केलेली कंपनी आहे. या कंपनीकडून संबंधित प्रशासकीय विभाग व कार्यालय यांनी त्यांच्या स्तरावर कंत्राट दिली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) तालुक्यात विभक्त कुटुंबांना शिधापत्रिका नसल्याबाबत

(८३) * ६८१० श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यात सन १९९८ पासून अनेक विभक्त कुटुंबांना शिधापत्रिका नसल्याने ती अन्न सूरक्षेपासून वंचित असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्याच आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने या विभागातील पुरवठा विभागाकडून तात्काळ सर्वे करुन या सर्व विभक्त कुटुंबांची नोंद करुन त्यांना अन्न सुरक्षेचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र अध्ययन केंद्राच्या कामकाजाबाबत

(८४) * ७७१८ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने मुंबई विद्यापीठाने माजी कुलगुरु डॉ.स्नेहलता देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यांची समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र अध्ययन केंद्राच्या गेल्या चार वर्षापासून किती बैठका झाल्या आहेत,

(३) असल्यास, या अध्ययन केंद्राने राज्याच्या राजकीय, सामाजिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करुन कोणत्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, याबाबतची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबई विद्यापीठाने प्रस्तावित केलेल्या महाराष्ट्र अध्ययन केंद्रासंदर्भात दिनांक २९ एप्रिल, २०१० रोजी बैठक झालेली असून याबाबत पुढील कार्यवाही विद्यापीठ स्तरावर करण्यात येत आहे.

देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

(८५) * ८११९ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (ता.जि.सिंधुदुर्ग) येथे देवगड नगर पंचायत होणे प्रस्तावित आहे.परंतु अद्याप नगर पंचायत अस्तित्वात न आल्याने सदरहू परिसरातील नागरिकांना पाण्यापासून वंचित ठेवण्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांची पाण्यापासून गैरसोय होत आहे हे पाहता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) हे खरे नाही.

देवगड व जामसंडे या गावांना देवगड प्रादेशिक पाणी पुरवठा योजना व दहिबांव नळ पाणी पुरवठा योजना दोन योजनांद्वारे जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या सावळया गोंधळाबाबत

(८६) * ७२४२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या वेळापत्रक हॉलतिकिटांच्या गोंधळानंतर बीएमएसच्या प्रश्नपत्रिकांतील चुका लक्षात आल्यानंतर परीक्षा विभागाच्या सावळया गोंधळामुळे विद्यार्थी हैराण झाले असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षादरम्यान वारंवार होणाऱ्या गोंधळाबाबत तसेच प्रशासनाने प्रश्नपत्रिका काढण्यापूर्वी चुका तपासणीकांकडून चुका शोधून काढल्या जात आहेत की नाही याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) प्रश्नपत्रिकेतील त्रुटी लक्षात आल्या हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्राश्निक विद्यापीठामध्ये प्रश्नपत्रिका सुपुर्द करतात तेव्हा त्यामध्ये काही चुका नाहीत याची खात्री करुनच देतात. त्यासंदर्भात विद्यापीठ त्या प्राश्निकांकडून हमीपत्रही भरुन घेत असते.

सदर विषयाच्या प्रश्नपत्रिका काढताना केलेल्या हलगर्जीपणामुळे संबधीताना परीक्षा नियंत्रक मुंबई विद्यापीठ यांनी दि. ८ मे, २०१५ अन्वये कारणे दाखवा, नोटीस बजावली असुन सदरहू बाब विद्यापीठाच्या परीक्षा मंडळापुढे ठेवण्यात येणार आहे.

मुंबईत स्वस्त धान्य दुकान (रेशनिंग) चालविण्याबाबत

(८७) * ७११८ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत स्वस्त धान्य दुकान (रेशनिंग) चालविण्यासाठी या विभागाच्या अधिकाऱ्यांना वर्षभरात किमान ५० हजारांची लाच द्यावी लागत असल्याचा आरोप मुंबई रेशनिंग कार्डधारक संघटनेने केला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुकानदारांना तुटपुंजे कमिशन मिळत असताना भ्रष्ट अधिकाऱ्यांना वर्षाकाठी ५० हजारांचा हप्ता देणे कसे परवडते हा पैसा दुकानदार काळाबाजार करुन कमवतात असाही आरोपी संबंधित संघटनेने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग-१ व २ विचारात घेता शासन रेशनिंग विभागातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी महिला बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शिधावाटप दुकाने चालविण्यास देण्याबाबत शासनाचा काय विचार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

या संदर्भातील बातमी दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या दैनिक लोकमत व दिनांक २१ एप्रिल, २०१५ च्या दैनिक सकाळ मध्ये प्रसिध्द झाली होती.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याचे वितरण कोणत्याही प्रकरच्या गैरव्यवहाराशिवाय शिधापत्रिकाधारकांना नियमितपणे उपलब्ध व्हावे, या करीता राज्यातील प्रत्येक रास्तभाव दुकानाच्या वर्षातून किमान दोनदा व सहा महिन्यातून किमान एकदा नियमित तापसण्या करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी, २०१२ अन्वये सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

महिला बचत गटाना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शिधावाटप दुकाने महिला स्वयं सहायता बचत गटांना प्राधान्याने मंजूर करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, २००७ नुसार कार्यवाही करण्यात येते.

मुंबई विद्यापीठाच्या ७४० संलग्न महाविद्यालयांनी मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबत

(८८) * ७१७८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या ७४० संलग्न महाविद्यालयांना मराठी भाषा दिन साजरा करण्याबाबत विद्यापीठाने परिपत्रक काढून निर्देश दिले असतानाही ५६९ महाविद्यालयांनी मराठी भाषा दिन साजरा केला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषा दिन साजरा न करणाऱ्या महाविद्यालयांची चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विद्यापीठ स्तरावर पडताळणी करुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील स्टेला मॉरीस कॉन्व्हेंट येथे विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्यात आल्याबाबत

(८९) * ७२८७ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील स्टेला मॉरीस कॉन्व्हेंट येथे शिक्षण घेणाऱ्या इयत्ता ३ री ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करण्यात आल्याचे दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार वर्ग १ ते ८ पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शाळेने शासनाच्या शैक्षणिक धोरणाचे उल्लंघन केल्या प्रकरणी सदर शाळेवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील दलित वस्तीतील नागरीकांना स्वच्छतागृह व नळपाणी जोडणी योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही

(९०) * ७६४९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सुवर्ण महोत्सवी वर्षी सन २०१२-१३ मध्ये दलित वस्ती योजनेअंतर्गत दलित वस्तीतील नागरीकांना स्वच्छतासह नळपाणी कनेक्शनसाठी अनुक्रमे ११ व ४ हजार रुपये देण्याचे ठरले होते त्यानुषंगाने सदरील योजनेअंतर्गत कुडाळ तालुक्यात सुमारे ५०० लाभार्थी होते परंतू त्यातील बरेचशे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले असून त्यांना या योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुडाळ पंचायत समितीमधून या योजनेसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून पत्रव्यवहार करण्यात आलेला असतानाही संबंधित लाभार्थ्यांना मागील दोन वर्षापासून अद्यापपर्यंत लाभ देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित लाभार्थींना त्वरीत लाभ देण्यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) व (२) महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेतंर्गत कुडाळ तालुक्यातील ६९ ग्रामपंचायत क्षेत्रातील ४७७ लाभार्थ्यांनी नळ जोडणीसाठी मागणी केलेली आहे तसेच वैयक्तिक शौचालयासाठी ८४ लाभार्थ्यांनी मागणी केलेली आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रु. ८.६६ लक्ष एवढा निधी कुडाळ तालुक्यासाठी दिलेला आहे. सदर रक्कमेचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस वितरीत रु. ३२.१९ लक्ष अनुदानापैकी सन २०१४-१५ मध्ये कुडाळ तालुक्यासाठी रु. ४.१९ लक्ष देण्यात आलेले होते. त्यापैकी कुडाळ तालुक्याने सन २०१४-१५ मध्ये रु. ३,०३,६९६/- इतका खर्च केलेला असून रु. १,१६,३०४/- अखर्चीत ठेवलेला आहे.

(३) शासन निर्णय क्र. ग्रादयो-३५१४/प्र.क्र.८९/पापु-१६, दि. ४.३.२०१५ अनव्ये सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेस रु. १९,९५,५००/- एवढा निधी वितरीत करण्यात आला असून, सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेने अनुदान वाटपासाठी सुधारीत मागणीपत्र दि. ३.७.२०१५ अन्वये मागविले असून कुडाळ तालुक्यातून मागणीपत्र प्राप्त होताच अनुदान वितरीत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

किनवट (जि.नांदेड) तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

(९१) * **७०८६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यात भुजल सर्वेक्षण विभागाने जानेवारी, २०१५ मध्ये विहिरींची जलपातळीची पडताळणी केली असता भूजलपातळी सरासरी ५.५ मीटर असायला पाहिजे असता ती ६.३५ मीटरपर्यंत खोल गेली असल्याने येथील नागरीकांना तीव्र पाणीटंचाई भासली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे होणारी दरवर्षीची तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता शासनाने येथील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, तथापि काही ठिकाणच्या निरीक्षण विहीरींच्या भूजल पातळीत वाढ आढळून आली आहे.
(२) अ) सन २०१४-१५ मध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांचे स्तरावरुन टंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात आला. त्यापैकी किनवट तालुक्यामध्ये-
(i) नवीन विंधन विहिरींची १४ गावांमध्ये १४ कामे पूर्ण करण्यात आली.
(ii) २२ गावे व ५ वाड्यांमध्ये ५९ विहिर अधिग्रहणाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला
(iii) ३ गावे व २ वाड्यांमध्ये ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला.
(iv) ९ गावांमध्ये ९ नळ पाणी पुरवठा दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली.
(v) एका गावामध्ये पूरक नळ पाणी पुरवठयाचे काम पूर्ण करण्यात आले.

ब) पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या वाडया/वस्त्यामध्ये पिण्याच्या पाण्याचे उद्वव बळकटीकरणासाठी केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) अंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोत बळकटीकरणाच्या उपाययोजना राबविण्यात आल्या.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मुलींसाठी शिक्षण प्रोत्साहन योजनेची अंमलबजावणी न केल्यामुळे केंद्र शासनाचा प्राप्त निधी खर्च न झाल्याबाबत

(९२) * **७५४८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती आणि जमाती या प्रवर्गातील मुलींच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण रोखले जावे या उदात्त हेतूने केंद्रशासनामार्फत माहे जुलै, २००८ मध्ये मुलींसाठी "शिक्षण प्रोत्साहन योजना" सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत लाभार्थी ठरलेल्या १ लाख ६ हजार ६३९ विद्यार्थीनीसाठी सन २०११-१२ मध्ये १६ कोटी ७१ लाख रुपये आणि २०१२-१३ या वर्षासाठी १५ कोटी २८ लाख असे एकूण ३१ कोटी ९९ लाख रुपयांचा निधी राज्य शासनाकडे वितरित केला असल्याचेही दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून निधी वितरित करण्यात येऊनही शिक्षण विभागाने या योजनेची अंमलबजावणी न केल्यामुळे हा सर्व निधी राज्य शासनाकडे जमाच झाला नसल्यामुळे लाखो विद्यार्थीनींना या योजनेपासून वंचित रहावे लागल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी न करण्यास जबाबदार कोण आहे व अशा अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(२) निधी राज्य शासनाकडे वितरित केला हे खरे नाही. मात्र, केंद्र शासनाकडून सदर शिष्यवृत्तीची रक्कम पात्र लाभार्थी असलेल्या विद्यार्थ्यानींच्या बँक खात्यात परस्पर जमा केली जाते.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगांव शहरातील केशरी कार्ड धारकांना रेशन दुकानातून साखर, गहू, तांदूळ व रॉकेल मिळण्याबाबत

(९३) * ९७१४ श्रीमती स्मिता वाघ, श्री.गुरुमुख जगवानी : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील व शहरातील ९० हजार केशरी कार्ड धारकांना रेशन दुकानातून ८ महिन्यांपासून साखर, गहू, तांदूळ व रॉकेल मिळणे बंद झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, या कार्डधारकांना रेशन दुकानातून रॉकेल, साखर, गहू, तांदुळचा त्वरीत पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत लाभ मिळण्यास पात्र नसणा-या जळगाव जिल्ह्यातील व शहरातील ए.पी.एल. (केशरी) शिधापत्रिकाधारकांना राज्य शासनाने पूर्वीच्या ए.पी.एल. दराने व परिमाणात माहे मे, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत अन्नधान्य उपलब्ध करुन दिले आहे. त्यानंतरच्या कालावधीमध्ये सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

ए.पी.एल.(केशरी) शिधापत्रिकाधारकांना सप्टेंबर, २००९ पासून प्रतिकार्ड दोन किलो साखर रुपये २०/- प्रति किलो या दराने वितरीत करण्यात येत होती, सदर योजना माहे फेब्रुवारी, २०११ पासून शासनाने बंद केली आहे.

केंद्र शासनाने माहे एप्रिल, २०१५ पासून राज्याच्या केरोसिन नियतनात पूर्वीच्या केरोसिन नियतनाच्या ५ टक्के इतकी वाढ केली आहे. सदर नियतन राज्याच्या केरोसिन मागणीच्या २९ टक्के इतके आहे. जळगांव जिल्ह्याची केरोसिनची मागणी विचारात घेऊन उपलब्धतेच्या प्रमाणात शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरीत करण्यात येत आहे.

वाशिम व अकोला येथील जिल्हापरिषदेमधील शाळामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत

(९४) * ९८०८ श्री.श्रीकांत देशपांडे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील नव्याने निर्माण झालेले जिल्हे वाशिम व अकोला येथील जिल्हापरिषदेमधील शाळामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना चार-चार महिने वेतनापासून वंचित राहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वारंवार मागणी होवून सुद्धा त्यावर शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने निर्माण झालेले जिल्हे अनेक वर्षापासून अस्तित्वात असूनही फक्त शिक्षकानांच वेतनापासून वंचित राहावे लागते आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यावर शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

(९५) * १००३५ श्री.विजय सावंत, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ३११६ ला दिनांक १९ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत सत्वर कार्यवाही करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(२) मुंबई येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ सुरु झाले आहे. औरंगाबाद व नागपूर येथील राष्ट्रीय विधी विद्यापीठ सुरु करण्यासाठी कुलगुरुच्या नियुक्तीची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अतिविशेषोपचार रुग्णालय नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर व शासकीय आयुर्वेद रुग्णालय नागपूर येथील रिक्त पदे भरण्याबाबत

(९६) * ७२९७ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) नागपूर शहरातील सर्वात जुने व सर्वात मोठे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अतिविशेषोपचार रुग्णालय नागपूर, आणि शासकीय आयुर्वेद रुग्णालय नागपूर या तिन्ही रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची किती व केव्हापासून पदे रिक्त आहेत,
(२) असल्यास, अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे रुग्णांच्या उपचारामध्ये विलंब होत असून रुग्णांनाच किंवा त्यांच्या नातेवाईकांनाच कर्मचाऱ्यांची कामे करावी लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदरहू रिक्त पदे केव्हापर्यंत भरणे अपेक्षित आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे डॉक्टरांचे ०१, परिचारिकांची १९६ व कर्मचा-यांची २८९ पदे रिक्त आहेत.

अतिविशेषोपचार रुग्णालय, नागपूर येथे डॉक्टरांची ११, परिचारिकांची १० व कर्मचा-यांची १४ पदे रिक्त आहेत.

शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर येथे डॉक्टरांचे ०१, परिचारिकांची ०३ व कर्मचा-यांची ३१ पदे रिक्त आहेत.

उपरोक्त सर्व पदे वेळोवेळी नियतवयोमान, सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, बदली इ. कारणांमुळे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया नियमानुसार सुरू आहे.

राज्यातील अशासकीय अनुदानित चित्रकला व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना १०० टक्के वेतन अनुदान दरमहा नियमित मिळणेबाबत

(९७) * ७५१८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.सुधीर तांबे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४६ ला दिनांक १९ मार्च,२०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अशासकीय अनुदानित चित्रकला महाविद्यालये व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना वेतन अनुदान ९० टक्के ऐवजी १०० टक्के दरमहा नियमित मिळणेबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,

(२) घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) राज्याची सध्याची आर्थिक परिस्थिती पहाता, तूर्त मागणी मान्य करता येणे शक्य नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

सुरगाणा (जि.नाशिक) जिल्ह्यातील धान्य घोटाळ्याबाबत

(९८) * १०१६४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.संदिप बाजोरिया, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ४८०९ ला दिनांक ९ एप्रिल, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५ च्या (मार्च) अर्थसंकल्पीय अधिवेशनात नाशिक जिल्ह्यातील धान्य घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर महसूल विभागातील ७ तहसिलदारांना निलंबित करण्याची घोषणा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालात या सर्व सातही तहसिलदारांच्या कार्यक्षेत्रात धान्य वितरण व्यवस्थेत कोणताही अपहार व अनियमितता आढळून आलेली नाही त्यामुळे सदर तहसिलदारांना निलंबित करु नये असे स्पष्टपणे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल विचारात न घेता सदर तहसिलदारांना निलंबित केल्याचे आदेश निर्गमित केल्यामुळे महसूल कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण असून सरकारने केलेली कार्यवाही चुकीची असल्याचा आरोप महसूल कर्मचाऱ्यांनी करुन काम बंद आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या धान्य घोटाळ्याच्या प्रकरणाच्या चौकशीची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.
(२) महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडून अहवाल मागविला होता. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालात सुरगाणा धान्य घोटाळ्याशी ७ तहसिलदारांचा प्राथमिक चौकशीमध्ये कोणताही प्रत्यक्ष संबंध दिसुन येत नसल्याने व प्राथमिक चौकशीमध्ये ७ तहसलिदारांनी आवश्यक असणारे सर्व अहवाल वेळोवेळी दिलेले असल्याने कोणत्याही चौकशी शिवाय त्यांना निलंबित करणे न्यायोचित होणार नाही असा अहवाल जिल्हाधिकारी नाशिक यांनी दिलेला आहे.
(३) तहसिलदार यांना निलंबित केल्याच्या निषेधार्थ तहसिलदार, नायब तहसिलदार संघटना, महसुल अधिकारी आणि महसुल कर्मचारी संघटना यांनी दिनांक २० मे, २०१५ पासुन पुरवठा विषयक कामकाज बंद केले होते.
(४) सुरगाणा शासकीय धान्य गोदामातील अपहार प्रकरणी प्रथमदर्शनी सहभागी असल्याचे निदर्शनास आल्याने १.श्री.रमेश दौलत भोये, गोदामपाल, सुरगाणा, २.वाहतुक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यामधील भागीदार श्री.मोरारजी भिकुलाल मंत्री, ३.भागीदार, सौ.सुषमा मोरारजी मंत्री, ४. भागीदार, श्री.संजय रामकृष्ण गडाख, ५.श्री.वाय.एम.मंडलीक, वाहतुक प्रतिनिधी, नाशिकरोड/अंबड डेपो, ६.श्री.एच.जी.धुम, पुरवठा निरीक्षक, सुरगाणा ७.तहसिलदार सुरगाणा यांचेविरुद्ध शासकीय धान्याचा अपहार केलेप्रकरणी भा.द.वि.कलम ४०९, ४२०,४६७,४६९,४७१ जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ मधील कलम ३(७) व सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश २००१ चे कलम ६(४) चे उल्लंघन केलेले असल्यामुळे सुरगाणा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.९/२०१५, फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात दिनांक १२/०५/२०१५ रोजी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय सुरगाणा (दिंडोरी कोर्ट) येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त नाशिक यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती दिनांक १९.५.२१०५ च्या आदेशान्वये गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीच्या अहवालात अपहारामध्ये तत्कालीन गोदामपाल, पुरवठा निरीक्षक तहसिलदार सुरगाणा, वाहतूक प्रतिनिधी, वाहतूक ठेकेदार व त्यातील भागीदार हे सदर धान्य अपहारामध्ये प्रत्यक्ष सहभागी असून त्यांनी संगनमताने सदर धान्याचा अपहार केलेला आहे. तहसिलदार पेठ, दिंडोरी, सिन्नर, निफाड, नाशिक, त्र्यंबकेश्वर यांचा सुरगाणा येथील शासकीय धान्य गोदामामध्ये झालेला धान्य अपहार प्रकरणाशी संबंध दिसून येत नाही. तहसिलदार, ईगतपूरी यांनी माहे सप्टेंबर, २०१४ अखेरची केलेली त्रैमासिक गोदाम तपासणी अहवाल उपलब्ध अभिलेखावरुन संशयास्पद असल्याने त्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केला असल्याचे दिसून आले आहे.

महसुल व वन विभागाच्या दिनांक १९/०५/२०१५ च्या निलंबन आदेशाविरुद्ध ७ निलंबित तहसिलदारांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे अपिल दाखल केले होते. सदर प्रकरणी न्यायाधिकरणाने दिनांक १६/६/२०१५ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या निलंबन आदेशास स्थगिती देऊन सदर तहसलिदारांना पुर्वीच्याच पदावर पुनःस्थापित करणेबाबत आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २९ जुन, २०१५ रोजीच्या आदेशान्वये सर्व ७ तहसिलदारांना शासन सेवेत पुनःस्थापित करुन त्यांना निलंबना पुर्वीच्याच पदावर पुनःस्थापित करण्यात आले आहे.

राज्यातील विद्यापीठात आणि महाविद्यालयात रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या जागा भरण्याबाबत

(९९) * ७५८४ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोणत्याही विद्यापीठात आणि महाविद्यालयात रिक्त असलेल्या प्राध्यापकांच्या जागा पुढील आदेशापर्यंत भरण्यात येऊ नये असा निर्णय दिनांक १० एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये यामधील प्राध्यापकांच्या शेकडो जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्राध्यापकांच्या रिक्त जागा अग्रक्रमाने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. शासनाच्या दि. २२.०१.२०१४ च्या संवर्गनिहाय आरक्षणाबाबतच्या निर्णयास मा.उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने दि. २२.०१.२०१४ च्या शासन निर्णयास दि. १० एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आलेली आहे. सदरची बाब धोरणात्मक असल्याने विधी व न्याय विभागाचा सल्ला घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे येथील ससून रुग्णालयातील परिचारीकांनी वेतनवाढ व रिक्त पदे भरणेबाबत पुकारलेले संप

(१००) * ६९१६ श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयातील परिचारीकांनी वेतनवाढ, रिक्त पदे भरणे व स्वतंत्र संचालनालय निर्माण करणे इत्यादी मागण्यांसाठी महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन तर्फे राज्यव्यापी संप पुकारण्यात आल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ससून रुग्णालयातील परिचारीकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र गव्हर्नमेंट नर्सेस फेडरेशन तर्फे राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत काम करणा-या परिचारिकांनी दिनांक ५/५/२०१५ रोजी दोन तास सकाळी ७.३० ते ९.३० या कालावधीत काम बंद केलेले होते. त्यानंतर ९.३० वाजता सर्व परिचर्या संवर्गातील कर्मचारी कामावर हजर झाल्या आहेत.

(२) व (३) वेतनवाढी मंजूर करणे, आश्वासित योजनेचा फायदा देणे ही बाब संस्था प्रमुखांच्या अखत्यारित असल्याने संचालनालय स्तरावर अधिसेविकांना सूचना देऊन नियमानुसार वेतनवाढी व आश्वासित प्रगती योजनेचा फायदा देणेबाबत कळविले आहे.

ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे अधिपरिचारिकांची एकूण मंजूर पदे पूर्णतः भरण्यात आलेली आहे. (एकूण ९१६ पदे) तसेच परिसेविका व इतर परिचर्या संवर्गातील पदोन्नतीची ५७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांसाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक माहे जुलै, २०१५ मध्ये आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीत मान्यता मिळाल्यानुसार परिसेविका व इतर परिचर्या संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

राज्यात हजारो पॅथॉलॉजी लॅब अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून संचलित करण्यात येत असल्याबाबत

(१०१) * ९८५५ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वसाधारणपणे केवळ २ हजार प्रशिक्षित पॅथॉलॉजिस्ट असतांना पॅथॉलॉजी लॅबची संख्या ५ हजार असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षित व अधिकृत पॅथॉलॉजिस्टच्या लॅबस वगळता अन्य लॅबचे संचालन अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून केले जात असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इ. १० वी व इ. १२ वी झालेले कर्मचारी सर्रास रक्त, लघवी व बॉडी फ्युएडच्या चाचण्याचे रिपोर्ट तयार करीत असल्याने रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून चालविल्या जाणाऱ्या पॅथॉलॉजी लॅबवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही. शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

रात्रशाळांच्या विकासासाठी शाळा परिवर्तन कार्यक्रमास मान्यता मिळण्याबाबत

(१०२) * ७६६६ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील रात्रशाळांना गुणात्मक व संख्यात्मक विकासासाठी मासूम संस्थेने शाळा परिवर्तन कार्यकमास मान्यता मिळण्याबाबत शिक्षण सचिवांकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच शाळा परिवर्तन कार्यक्रमास मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) व (३) रात्रशाळांच्या गुणात्मक व संख्यात्मक विकासासाठी मासूम या संस्थेच्या रात्रशाळा परिवर्तन कार्यक्रमास मान्यता देणे, मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन यांचे प्रशिक्षण, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाढीसाठी विविध उपक्रम राबविणे इत्यादी स्वरुपाच्या मागण्या असून सदर मागण्यांबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही.

परभणी जिल्ह्यात अप्रमाणित कंपन्यांकडून दुषित पाण्याची विक्री होत असल्याबाबत

(१०३) * १०२०७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरासह जिल्ह्यात ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड (बीआयएस) ची मान्यता नसतांनाही हजारो अप्रमाणित कंपन्यांनी दुषित पाण्याची विक्री करुन जनतेची फसवणूक केल्यावरुन अशा कंपन्यांची अन्न व औषधी प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबत परभणी येथील मराठवाडा विकास परिषदेने मा.अन्न व औषधी प्रशासन मंत्री यांच्याकडे सन २०१५ च्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संबंधित अप्रमाणित पाणी कंपन्या व त्यांना पाठीशी घालणाऱ्या दोषी अन्न व औषधी प्रशासन विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, परभणी जिल्ह्यात बीआयएसचे मान्यता नसलेल्या एका पेढीकडून नमुना घेण्यात आला असून, त्यांचेपिरुध्द न्यायालयीन कारवाई करण्यात येत आहे. तसेच बीआयएस असलेल्या एका पेढीकडे अन्न सुरक्षा व मानदे कायद्याअंतर्गत

परवाना नसल्यामुळे विनापरवाना खटला दाखल केला आहे. तसेच जिल्ह्यात बीआयएस प्रमाणपत्र धारण केलेल्या पेढयांमधून एकूण १५ नमुने घेण्यात आले असून त्यापैकी ०२ असुरक्षित नमुन्याप्रकरणी खटले दाखल केले असून ०६ लेबलदोष आढळलेल्या नमुन्याप्रमकरणी न्यायनिर्णयाद्वारे रु. ०१,०९,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगावच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्याबाबत

(१०४) * ८०५० श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८८ ला दिनांक २६ दिनांक २६ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:

सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगावच्या धर्तीवर नाशिक येथे दादासाहेब फाळके चित्रपटसृष्टी निर्माण करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक ५ नोव्हेंबर, २०१४ रोजी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळास जागेच्या माहितीसह सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चित्रपटसृष्टीच्या भुसंपादनासाठी शासनाने दिनांक २७ ऑगस्ट, २००९ रोजी रुपये १० कोटी निधी मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चित्रपटसृष्टीसाठी जमीनीचे संपादन करुन सदर चित्रपटनगरीचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) जिल्हाधिकाऱ्यांनी जागेशी संबंधित फक्त कागदपत्रे महामंडळाला पाठविली आहेत.

(२) नाशिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयान्वये या प्रयोजनार्थ रु. १० कोटी नियतव्यय निश्चित करण्यात आला.

(३) सदर प्रकल्पासाठी नाशिक येथील मुंढेगाव, ता. इगतपूरी येथील संबंधित जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे हस्तांतरीत करण्याची विनंती महसूल व वन विभागाला करण्यात आली आहे. जागा हस्तांतरीत झाल्यावर पूढील कार्यवाही सुरु होऊ शकेल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत पालिकेकडून सुरु असलेल्या ऑनलाईन प्रक्रियेबाबत

(१०५) * ७७२६ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत पालिकेकडून सुरु असलेली ऑनलाईन प्रक्रिया चालू असून माहे एप्रिल, २०१५ अखेर दोन हजाराहून अधिक मुले शाळेबाहेर असल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलांना प्रवेश देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) व (३) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार २५% आरक्षणातंर्गत प्रवेश प्रक्रियेबाबतच्या दिनांक ३० एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयास मा. उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. तथापि, दिनांक २९/४/२०१५ पूर्वी अस्तित्वात असलेल्या शासन धोरणानुसार/ आदेशानुसार प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी अशा सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

विद्यार्थ्यांना एटीकेटीच्या परिक्षेकरीता भरलेले पैसे परत मिळण्याबाबत

(१०६) * ७८३३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात पुनर्मूल्यांकनात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे एटीकेटी च्या परिक्षेकरिता भरलेले पैसे वेळेत परत करण्याऐवजी विद्यार्थ्यांना त्यासाठी वारंवार जावे लागत असल्याने त्यांना शारिरीक आणि मानसिक त्रास होत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना एटीकेटीच्या परिक्षेकरीता भरलेले पैसे वेळेत मिळण्याबाबत प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात सिंचन तलावाची भूजल पातळी खाली गेल्यामूळे निर्माण झालेली पाणी टंचाई

(१०७) * **७४१८ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात सिंचन तलावाची भूजल पातळी खाली गेली असल्याने व प्रकल्पात पाणी नसल्यामुळे २०६ गावांना पाणी टंचाई निमार्ण झाल्याचे दिनांक ३ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, चंद्रपूर यांनी मार्च २०१५ मध्ये निरीक्षण विहीरीतील पाण्याच्या पातळीच्या आधारे ६ तालुक्यातील एकूण २०६ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता दर्शविली आहे.

त्या अनुषंगाने ग्राम पंचायतीच्या मागणीनुसार २०० गावांसाठी ३०३ उपाययोजनांचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला होता. सदर आराखड्यातील १५ गावांतील २५ उपाययोजना पूर्ण करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात १२ जून, २०१५ पासून पावसाळा सुरु झाल्यामुळे उर्वरित कामे करण्याची आवश्यकता भासली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील उपकरणाची झालेली चोरी

(१०८) * ७३३८ श्री.अनिल सोले : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर स्थित शासकीय वैद्यकीय रुग्णालयामध्ये खाजगी सुरक्षा रक्षकाकडून सुरक्षेचे कार्य केले जाते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रक्षकांवर किती खर्च केला जातो,

(३) असल्यास, खाजगी सुरक्षा असतांनाही हया परिसरात शासकीय उपकरण तसेच रुग्णांच्या सामानाची चोरी झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशींच्या अनुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे आहे.

(२) सुरक्षा रक्षकांवर दरमहा रु. ६,१७,५४५/- एतका खर्च होतो.

(३) (४) व (५) संस्थेमधील १० वातानुकुलीत यंत्राचे एअर कॉम्प्रेसर चोरीला गेले होते. याबाबत अजनी पोलीस स्टेशन, नागपूर येथे दिनांक १२/०४/२०१३ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. पोलीस प्रशासनाचा अहवाल प्राप्त आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

द्वार पोहोच योजनेतील वाहन चालकांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत

(१०९) * ७४८७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) द्वार पोहोच योजनेतील दहा वाहन चालक सन १९९८-९९ पासून दि.महा.स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन येथे कार्यरत असून त्यांना हंगामी, कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या इतर कर्मचा-यांप्रमाणे सेवेत कायम करण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, द्वार पोहोच योजनेत काम करणा-या चालकांची इतर कर्मचा-यांप्रमाणे जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी बदल्या केलेल्या आहेत, त्याचबरोबर त्यांना निवडणूक कामासाठी जिल्हाधिका-यांनी कर्तव्यावर घेतलेले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसुल व वन विभागाचा शासन निर्णय दिनांक ११/४/२०००, दिनांक १६/१०/२०१२ प्रमाणे भूकंप पुनर्वसन कार्यक्रम आणि सामाजिक वनीकरण विभागातील कर्मचा-यांच्या धर्तीवर उक्त कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. गिरीश बापट : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) द्वार पोच योजनेअंतर्गत राज्यातील अवर्षण प्रवण व आदिवासी विकास क्षेत्रातील रास्त भाव दुकानांना अन्नधान्याची वाहतूक करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळ या संस्थांना अभिकर्ता संस्था म्हणून नेमण्यात आलेले आहे. या कामासाठी या संस्थांना शासनाकडून वाहने पुरविण्यात आलेली होती. या वाहनांचे भाडे शासनाकडून अदा करण्यात येते. या वाहनांसाठी संस्थांकडून कंत्राटी पद्धतीने वाहन चालक नेमण्यात आलेले आहेत. बीड जिल्ह्यातील सदर १० वाहनचालक या पद्धतीचा भाग आहेत.

राज्य शासनाने सुधारित धान्य वितरण प्रणाली संपूर्ण राज्यात राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारित धान्य वितरण पद्धतीनुसार जिल्हास्तरावर एकाच कंत्राटदाराकडून दोन्ही टप्प्यातील वाहतूक केली जाणार आहे. त्याअनुषंगाने बीड सहीत अन्य ७ जिल्ह्यांमध्ये प्रत्यक्ष वाहतूक सुरू करण्यात आलेली आहे. सुधारित धान्य वितरण प्रणाली ज्या जिल्ह्यात लागू होणार त्या जिल्ह्यातील द्वार पोच योजना आपोआप संपुष्टात येणार आहे.

त्यामुळे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या या वाहन चालकांना शासनाने सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठातील कला शाखेच्या पदवीत्तर अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन देण्याबाबत

(११०) * ९०४४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठीला अभिजात भाषेचा दर्जा संपन्न व्हावा म्हणून राज्यशासन प्रयत्न करीत असताना मुंबई विद्यापीठात मात्र कला शाखेच्या पदवीत्तर अभ्यासक्रमाच्या विदयार्थ्यांना पुस्तकेच उपलब्ध होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, शासनाने येथील विदयार्थ्यांना पुस्तेक उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे

(२), (३) (४) मुंबई विद्यापीठ हे कोणतेही विद्याशाखेचे पुस्तक प्रकाशित करीत नाही. तथापी आजमितीस बाजारात कला शाखेच्या अभ्यासक्रमाची अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. विद्यार्थी या पुस्तकाचा लाभ घेतात. या व्यतिरिक्त कला शाखेच्या एखाद्या विषयाच्या संदर्भात अभ्यासक्रमाचे पुस्तक उपलब्ध होत नसेल तर विद्यार्थ्यांना नोटस उपलब्ध करुन देण्यात येतात.

अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना
क्षारयुक्त पाणी प्यावे लागत असल्याबाबत

(१११) * **७४११ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने ३० कोटी रुपये खर्चून बांधलेल्या महाजल योजनेच्या पाण्याच्या टाक्यांमध्ये सहा वर्षात पाण्याचा एक थेंबही जमा झाला नसल्याचे माहे मे २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांना क्षारयुक्त पाणी प्यावयास लागत असल्यामुळे अनेक नागरीकांना आजाराला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळूल आले, तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

मौजे चतारी, ता. पातूर जि. अकोला वगळता जिल्ह्यातील इतर गावात क्षारयुक्त पाण्यामुळे ग्रामस्थांना आजारांना सामोरे जावे लागत असल्याचे आढळून आले नाही.

(३) होय, जिल्हा स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.

(४) चौकशी अंती चतारी येथील पाणी पुरवठा योजनेच्या जुन्या विहिरीमध्ये सिलिकांचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती चतारी, ता पातूर यांनी नवीन योजनेच्या कामात अपहार केल्यामुळे त्यांच्यावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, क्षारयुक्त स्त्रोत त्वरीत बंद करण्याबाबत अथवा त्या स्त्रोतांचे पाणी पिण्याकरिता न वापरण्याबाबत सर्व संबंधितांना जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अकोला यांनी सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बारावीच्या परिक्षेत विद्यार्थ्यांना लॉग बुक
वापरण्याची परवानगी नाकारल्याबाबत

(११२) * **७३६५ श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले येथील एनपीकेटी विद्या मंदीर शाळेच्या परिक्षा केंद्रात बारावीच्या परिक्षेत विद्यार्थ्यांना स्वतःचे लॉग बुक वापरण्याची मुभा असतानाही त्यांना परवानगी नाकारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शिक्षण मंडळाच्या लॉग बुक मधील चुका लक्षात घेता शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना स्वतःचे लॉग बुक वापरण्याची परवानगी दिली असल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित बुक मधील चुकांबाबतचे शुद्धीपत्रकही विद्यार्थ्यांना देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार दोषीवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : (१) अंशत: खरे आहे. लॉगटेबलमध्ये Scientific Terms Formule व अन्य आक्षेपार्ह मजकूर नसलेली लॉगटेबल वापरण्याची परवानगी देण्यात आली होती.

(२) होय.

(३) होय.

(४) होय. या प्रकरणाची चौकशी करुन केंद्रसंचालकावर कारवाई करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मॅगी (नेस्ले कंपनीच्या) खाद्य पदार्थावर बंदी घातल्याबाबत

(११३) * ९११२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मॅगी (नेस्ले कंपनीच्या) खाद्य पदार्थावर बंदी आणण्यात आली असल्याचे माहे जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मॅगीप्रमाणे इतरही परदेशातील खाद्य पदार्थ (चिप्स, बिस्कुट, च्युंगम, टॉफी, कुरकुरे, पिझ्झा हट, पिझ्झा कॉर्नर, मॅग डोनाल्ड व कोल्ड ड्रिंक्स (कोका कोला, पॅप्सी) या पदार्थाचे एफडीएने नमुने घेण्यात येऊन त्याची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यामध्ये मनुष्य शरीरास हानिकारक असे कोणते घटक आढळून आले आहेत,

(३) असल्यास, तपास केलेल्या नमुन्यामध्ये हानिकारक घटक नसल्यास सदरील कंपनीला परत परवानगी देण्यात येणार आहे काय, किंवा कसे याबाबत शासन खुलासा करील काय,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दि. ०६, जून २०१५ पासून राज्यात मॅगी (नेस्ले कंपनीच्या) मॅगी या खाद्यपदार्थाचे उत्पादन, साठा, वितरण, व विक्री यावर मंदीचे आदेश काढले आहेत.

(२) मॅगीप्रमाणे परदेशातील इतरही खाद्य पदार्थ (चिप्स, बिस्कुट, च्युंगम, टॉफी, कुरकुरे, पिझ्झ हट, पिझ्झा कॉर्नर, मॅग डोनल्ड व कोल्ड ड्रिंक्स (कोका कोला, पॅप्सी) या पदार्थाचे नमुने अन्न व औषधे प्रशासनाकडून नियमितपणे तपासण्यात येतात व संबंधित दोषींवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

सदर अन्न पदार्थात मनुष्य शरीरास हानीकारक असे कोणतेही घटक आढळून आलेले नाहीत.

(३) नेस्ले इंडीया लि. या कंपनीच्या उत्पादनाला अन्न सुरक्षा प्राधिकरण, नवी दिल्ली (FSSAI) यांनी दिनांक ०५ जून, २०१५ रोजीच्या आदेशान्वये बंदी घातलेली आहे. सदर कंपनीस परत परवानगी देण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनास नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

(११४) * ७१८२ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)महाड (जि. रायगड) तालुक्यात शासनाच्या उदासिन धोरण व प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भीषण पाणी टंचाईचे सावट पसरले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शिरवली पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्ती भागास ५२ लाखाचा निधी प्राप्त झालेला असून सदरील पाईपलाईनचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शिरवली ग्रामस्थ आणि पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे नुकतीच केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त पोलादपूर तालुक्यातील जलयोजना अक्षरश: कुचकामी आणि फोल ठरल्याने येथील जनतेला आजही पाण्यासाठी उन्हातान्हातून वणवण फिरावे लागत असल्याने व त्यात प्रामुख्याने डोंगरमाथ्यावर राहणाऱ्या अतिदुर्गम भागातील जनतेचे पाण्यावाचून प्रचंड हाल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रायगड जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या वर्षाचा महाड तालुक्याचा माहे ऑक्टोबर ते जून या कालावधीचा ८२ गावे व २२४ वाड्यांचा पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे गावाच्या मागणीप्रमाणे ४ गावे व ८० वाड्यांना दिनांक १६.०६.२०१५ अखेर ९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

शिरवली नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रुपये ३७,७८,५६९/- निधी प्राप्त झाला आहे व या कामातील पाईप चांगल्या दर्जाचे आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या वर्षाचा पोलादपूर तालुक्याचा माहे ऑक्टोबर ते जून या कालावधीचा ५२ गावे व १६३ वाड्यांचा पाणी टंचाई आराखडा तयार करण्यात आलेला आहे. ज्या गावांना पाणी टंचाई भासणार आहे अशा गावांचा ग्रामपंचायातीच्या मागणीनुसार आराखडयात समावेश करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे गावाच्या करण्यात आलेला आहे. व त्याप्रमाणे गावाच्या मागणीप्रमाणे ४ गावे व ४९ वाड्यांना दिनांक १९.०६.२०१५ अखरे ४ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(५) रायगड जिल्ह्यामध्ये सन २०१४-१५ या वर्षाच्या संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा अंतर्गत कृती आराखड्याप्रमाणे टंचाईग्रस्त ५८१ गावे व ९९५ वाड्या असे एकूण १५७६ ठिकाणी उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रत्यक्षात ६१ गावे व २३६ वाड्या असे एकूण २९७ ठिकाणी २ शासकीय व ३६ खाजगी असे एकूण ३८ टँकरद्वारे ग्रामपंचयातीच्या मागणीनुसार पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

दिनांक १५.०६.२०१५ अखेर ५९ गावे व १२१ वाडयांमध्ये एकूण १८० विंधण विहिरी खोदण्यात आल्या आहेत.

रायगड जिल्ह्यामध्ये २४ नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याचे आढळून आले. त्यापैकी ५ गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला आहे. सदर योजना कालबाह्य झालेल्या आहेत व तेथे उद्भव अपुरा आहे. या योजनांचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात समावेश करण्याची बाब विचाराधीन आहे.

(६) प्रश्न समावेश नाही.

नाशिक जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत

(११५) * **७६५३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई उपाययोजनांवर १४ कोटी रुपयांचा निधी खर्च केलेला असतानाही जिल्हयातील ५५२ गावे आणि ७७० वाड्या पाण्यापासून वंचित असल्याने सदरील गावातील लोकांना पाण्याकरीता वणवण फिरावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१५ या कालावधीकरीता २२ कोटी ५८ लाख रुपयांचा कृती आराखडा आखण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, माहे मे महिना संपत आला असून जिल्हयात पाणी टंचाईचे प्रमाण वाढल्याने मनमाडसह बऱ्याच गावांना पाण्याचे टँकर मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त जिल्हयाची पाणी टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हयाच्या संभाव्य टंचाई कृति आराखडयात ५५२ गावे व ७७० वाडयांचा समावेश करण्यात आला होता.

नाशिक जिल्हयामध्ये माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात १४० गावे व २१६ वाड्यांना एकूण ९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. तसेच, मे, २०१५ अखेरीस एकूण ५१ खाजगी विहीर अधिग्रहीत करण्यात आलेल्या होत्या.

माहे ऑक्टोबर २०१४ ते मार्च २०१५ पर्यंत टँकरसाठी एकूण रुपये १०९३.२० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) माहे ऑक्टोबर, २०१४ ते जून, २०१५ या कालावधीकरीता रुपये १३९९.५० लक्ष इतक्या किंमतीचा टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे नाही.

मनमाड नगरपरीषदेस सध्या पाणी टंचाई नाही. आवश्यकतेनुसार उर्वरीत टंचाईग्रस्त गांवाना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) पाणीटंचाई कार्यक्रमांतर्गत माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात १४० गावे व २१६ वाड्यांना एकूण ९२ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत होता व ५१ विहीरी अधिग्रहीत करण्यात आल्या होत्या. तसेच, १ तात्पुरती नळ पाणी पुरवठा योजना करण्यात आली असून जिल्हा नियोजन विकास निधीतून १३० विंधन विहीरींची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील पाणीटंचाईचे संकट दुर करण्याबाबत

(११६) * ७०८७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील ३/४ वर्षापासून मराठवाड्यात पुरेसा पाऊस झालेला नसल्याने सद्यस्थितीत मराठवाड्यातील सुमारे ९७१ गावे आणि ३३९ वाड्या तहानलेल्या आहेत. तसेच दिवसेंदिवस पाणीटंचाई भासणाऱ्या गावांच्या संख्येत वाढ होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आगामी मे महिन्यात पाणीटंचाईचे संकट तीव्र होणार असल्याने शासनाने पाणीटंचाई निवारणार्थ नियोजन करुन कोणती उपाययोजना केला आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर : (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २७.४.२०१५ च्या साप्ताहिक टँकर अहवालनुसार ९७१ गावे व ३३९ वाडयांमध्ये १२५६ टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरु होता.

(२) पाणी टंचाई निवारणार्थ औरंगाबाद विभागासाठी ऑक्टोबर २०१४ ते जून २०१५ पर्यतच्या कालावधीसाठी पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले असून त्या अंतर्गत १७७७८ गावे व ४८३८ वाड्यांसाठी एकूण २७६४५ उपाययोजनांचा रु. २४०६९.८९ लक्ष किंमतीचा कृती आराखडा प्रस्तावित करण्यात आला होता.

दिनांक १५.६.२०१५ रोजीच्या साप्ताहिक टँकर अहवालानुसार औरंगाबाद विभागात १४२८ गावे व ५५१ वाड्यांत एकूण १८९० टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मराठी भाषेला अभिजात दर्जा देऊन मराठी भाषा विद्यापीठ व मराठी भाषा भवन स्थापित करण्याबाबत

(११७) * ७५५४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील विविध राज्यांमध्ये स्थानिक प्रमुख भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी त्या त्या राज्यांत राज्य भाषांसाठीची विद्यापिठे असून महाराष्ट्रात प्रामुख्याने वर्धा येथे 'केंद्रीय हिंदी विद्यापिठ' तर रामटेक (नागपूर) येथे संस्कृत विद्यापिठ स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मान्यता दिली असल्याने अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी राज्य शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व यासंदर्भात निर्णय घेण्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून मराठी भाषेला प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी शासनाच्यावतीने 'मराठी भाषा विद्यापीठ' स्थापन करण्यात यावे, अशी राज्यातील जनतेकडून तसेच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यामातून सन २००७ मध्ये व त्यापूर्वीपासून देखील शासनाकडे आग्रही मागणी करण्यात येत असताना, अद्यापपावेतो मात्र मराठी भाषा विद्यापिठ स्थापन करण्यात आले नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, मराठी भाषा विद्यापिठ त्याचप्रमाणे मुंबई शहरात 'मराठी भाषा भवन' स्थापित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात आली आहे,

(५) तसेच अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याबाबतच्या विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भातील बाब ही केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने केंद्रीय मंत्रिमंडळ सचिवालय यांना सादर केल्याबाबतची माहिती सिचव तथा आयुक्त (गुंतवणुक व राजशिष्टाचार), महाराष्ट्र सदर, नवी दिल्ली यांनी दि. ११ जून, २०१५ च्या पत्रान्वये राज्य शासनाला कळविली आहे. याबाबत शासनाकडून केंद्रशासनाकडे सातत्याने पाठपुरवा करण्यात येत आहे.

(३) होय.

(४) मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात अभ्यास करुन राज्य शासनास शिफारशी सादर करण्यासाठी एक समिती गठीत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सुरु आहे.

मराठी भाषा भवनाच्या बांधकामाच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या आराखडयास व अंदाजपत्रकास मान्यता देणे, जागा मराठी भाषा विभागाच्या नावे कारणे इ. कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. बांधकामापूर्वी हेरिटेज समितीची मान्यता घेणे, भूखंडावरील आरक्षण बदलणे याबाबतची कार्यवाही नगर विकास विभागामार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी किंवा इंग्रजी भाषा अवगत नसल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक गुणावर परिणाम होत असल्याबाबत

(११८) * **९८११ श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये +२ स्तरावर उच्च व माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत (M.C.V.C.) उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना १२ वी च्या परिक्षेमध्ये प्रश्न पत्रिका उर्दू माध्यमातून न देता मराठी किंवा इंग्रजी च्या भाषेतून दिल्या जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठी किंवा इंग्रजी भाषा अवगत नसल्यामुळे त्याचा परिणाम त्यांच्या शैक्षणिक गुणांवर पडत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्याना अवगत असलेल्या उर्दू भाषेतून वर्ग १२ वी ची प्रश्न पत्रिका देण्याविषयी मागणी होवून व प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्या वतीने निवेदनाद्वारे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यावर कोणती उपाययोजना केली वा करणार आहे ?

श्री. विनोद तावडे : (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ विनिमय, १९७७ मधील तरतूदीनुसार प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, उर्दु, सिंधी आणि हिंदी या माध्यमांपैकी कोणत्याही एका माध्यमातून लिहिण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) निवेदन आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.